CMYK

सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

छत्रपती संभाजीनगर | बुधवार, दि. २५ फेब्रुवारी २०२६ | वर्ष – ३ रे | अंक ३१९ | पाने : ८ | किंमत रु. ६/–

# राज्यात एकाही डान्स बारला परवाना नाही : देवेंद्र फडणवीस

## नियम मोडणाऱ्या ऑर्केस्ट्रा बारचा परवाना कायमस्वरूपी रद्द करणार

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. २४ फेब्रुवारी :** राज्यात सद्यस्थितीत कुणालाही 'डान्स बार'चा परवाना देण्यात आलेला नाही, केवळ 'ऑर्केस्ट्रा बार'लाच परवानगी आहे. मात्र, ऑर्केस्ट्राच्या नावाखाली नियमांचे उल्लंघन होत असल्यास अशा बारचे परवाने केवळ निलंबित न करता, ते कायमस्वरूपी रद्द करण्यासाठी सरकार कायद्यात सुधारणा करणार आहे. याच किंवा पुढच्या अधिवेशनात यासंदर्भातील तरतूद करण्याचा आमचा प्रयत्न असेल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी (२४ फेब्रुवारी) केली.

विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात आमदार सुभाष देशमुख यांनी राज्यातील नियमबाह्य ऑर्केस्ट्रा बार आणि डान्स



बारवर कारवाई करण्याची मागणी केली होती. यावर उत्तर देताना मुख्यमंत्री आणि गृह राज्यमंत्री पंकज भोयर यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली. भोयर यांनी सांगितले की, न्यायालयाच्या नियमांनुसार ऑर्केस्ट्रा बारला परवाने दिले आहेत. जेथे नियमांची पायमल्ली केली जात असेल, अशा प्रकरणांची गंभीर दखल घेऊन, ज्या बारकडून तीन वेळा नियमांचे उल्लंघन होईल, त्यांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

चर्चेदरम्यान आमदार भास्कर जाधव यांनी पनवेलमध्ये रात्री लेडीज बारस–रखे प्रकार सुरू आहेत. दिवसा हे ढाबे आणि बार बंद दिसतात, मात्र रात्री दोन्ही बाजूंनी लेडीज बार सर्रास चाल–ताना दिसतात, असे निदर्शनास आणून दिले. यावर सविस्तर भाष्य करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, दिवंगत आर. आर. पाटील यांनी डान्स बार बंदीचे विधेयक आणले होते, जे सर्वोच्च न्यायालयाने निरस्त केले. त्यानंतर माझ्या कार्यकाळात पुन्हा विधेयक आणले गेले, मात्र बार मालकांनी आम्ही डान्स बार नव्हे तर ऑर्केस्ट्रा बार चालवू, असा युक्तिवाद न्यायालयात केला. त्यानुसार सरकारने ऑर्केस्ट्रा बारसाठी कठोर अटीशर्ती लागू केल्या आहेत. यामध्ये जागेचे क्षेत्रफळ, पैसे उडवण्यावर बंदी आणि नियमभंग केल्यास थेट गुन्ह्याची तरतूद आहे.

**कठोर कायद्याबाबत सूतोवाच**

पनवेल भागातून येणाऱ्या तक्रारींची चौकशी करून तातडीने तपास करण्याचे आदेश दिल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. नियम मोडणाऱ्या बारचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्याबाबत आमची बैठक झाली आहे. तीन किंवा पाच वेळा उल्लंघन झाल्यास कठोर कारवाई करण्यासाठी कायद्यात दुरुस्ती केली जाईल. यासंदर्भातील प्रस्ताव लवकरच सभागृहात आणला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## केरळचे नाव बदलून केरळम होणार?

**तिरुअनंतपुरम/वृत्तसंस्था:** केरळचे नाव बदलून केरळम करण्याचे विधेयक आज केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजूर होण्याची शक्यता आहे, जो राज्यातील विधानसभा निवडणुकीपूर्वीचा एक मोठा निर्णय आहे. राज्य विधानसभेने अधिकृत नोंदींमध्ये हे नाव बदलण्याचा ठराव आधीच मंजूर केला आहे. केरळमध्ये मे महिन्यापूर्वी १४० सदस्यांच्या निवडणुकीसाठी निवडणुका होण्याची अपेक्षा आहे. मात्र भारतीय निवडणूक आयोगाने अद्याप कोणतीही अधिकृत तारीख जाहीर केलेली नाही.

दरम्यान, २०२४ मध्ये हा ठराव मांडणारे मुख्यमंत्री पिनारायी विजयन यांची इच्छा होती की केंद्र सरकारने देशाच्या संविधानाच्या आठव्या अनुसूचीमध्ये समाविष्ट असलेल्या सर्व भाषांमध्ये दक्षिणेकडील राज्याचे नाव केरळ वरून केरळम करावे. दरम्यान, २५ जून २०२४ रोजी, विधानसभेने दुसऱ्यांदा हा ठराव मंजूर केला. कारण पहिल्या ठरावाचा आढावा घेणाऱ्या केंद्रीय गृह मंत्रालयाने काही तांत्रिक बदल सुचवले होते.

गेल्या वर्षी ९ ऑगस्ट रोजी राज्याचे नाव अधिकृतपणे बदलण्याची मागणी करणारा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

## अमेरिकेत जोरदार बर्फवृष्टी

**वॉशिंग्टन/वृत्तसंस्था:** अमेरिकेच्या ईशान्य भागात एका शक्तिशाली हिमवादळाने प्रचंड कहर माजवला आहे. मेरीलँडपासून मेनपर्यंतचे विस्तीर्ण भाग जाड बर्फाच्या चादरीखाली झाकले गेले आहेत. या भीषण हवामानामुळे शनिवार ते मंगळवारदरम्यान १०,००० हून अधिक उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. केवळ सोमवारीच ५,००० पेक्षा जास्त उड्डाणे रद्द झाली, तर मंगळवारसाठी १,३०० हून अधिक उड्डाणे आधीच रद्द करण्यात आली असून हजारो प्रवासी अडकले आहेत. न्यूयॉर्कमधील जॉन एफ. केनेडी आंतरराष्ट्रीय विमानतळ, लागार्डिया विमानतळ आणि बोस्टनमधील लोगान आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वाधिक प्रभावित झाले आहेत.







10 YEAR WARRANTY | BAJAJ SECURE • AMC • ROAD SIDE ASSISTANCE | 72198 21111 | SHRIRAM Finance | IDFC FIRST Bank ALWAYS YOU FIRST | BAJAJ AUTO CREDIT | L&T Finance | TATA CAPITAL Two Wheeler Loans

*नियम आणि अटी लागू. बचत 28 फेब्रुवारी 2026 पर्यंत उपलब्ध. दाखवलेली एकूण बचत ही कॅशबॅकची बचत, शून्य प्रोसेसिंग फी आणि 5 मोफत सर्व्हिसेस (3 स्टॅंडर्ड मोफत सर्व्हिसेस आणि 2 अतिरिक्त मोफत सर्व्हिसेस) यांची बेरिज आहे. मोफत सर्व्हिसेसची बचत शेड्यूल्ड लेबर शुल्कानुसार. लागू ऑफर्स मॉडेल्स/राज्यानुसार बदलू शकतात. शून्य पीएफवरील बचत फायनान्सर आधारावर स्थानांनुसार बदलू शकते. अर्थपुरवठा पूर्णपणे फायनान्सरच्या विवेकानुसार. साहसी दृश्ये एक्सपर्ट्सकडून, प्रोफेशनल सुपरवीजन अंतर्गत, नियंत्रित आणि बंद वातावरणात, सामान्य लोक किंवा सार्वजनिक रस्त्यांपासून दूर जागेत केली आहेत. या साहसी दृश्यांचं अनुकरण करू नये आणि नेहमी वाहतूक व सुरक्षिततेचे नियम पाळावे. पल्सार 125 ऑफर ही निऑन आणि कार्बन फायबर मॉडेल्सवर.

**Authorised Dealers For Bajaj Auto Ltd Aurangabad • Adalat Road** PAGARIYA BAJAJ 02406659937 • **AkashPusad** PAGARIYA BAJAJ 7709366111 • **Harsul Point** PAGARIYA BAJAJ 7709366111 • **Waluj** PAGARIYA BAJAJ 9168601253 • **Shendra ASHOK BAJAJ 8380025694• Bhokardan Road Sillod** ASHOK BAJAJ 8380001965 • **Beed** SWASTIK BAJAJ 9226765488, **Parli** SWASTIK BAJAJ 8830855581 • **Jalna** AMBRISH BAJAJ 8605466906 • **Latur** RAJYOG BAJAJ 9168775077 • **Udgir** RAJYOG BAJAJ 8329643399 •**Ahmedpur** 8149565419 • **Nanded** UJWAL BAJAJ 7770018779 ,Gangotri Bajaj 9765665222, • **Loha** 9834524366 • **Hingoli SAI SHAM BAJAJ** 8766819162• **Parbhani** MUTHA BAJAJ 7447241490• **Shendra** ASHOK BAJAJ 8380025694 • **Buldhana** ASHOK BAJAJ 8929643158 • **Shendra** ASHOK BAJAJ 8380025694 • **Osmanabad Raghuveer Bajaj** 9132113211 • **Ahmednagar Kinetic Chowk** Chhatrapati Bajaj 9175142881, • **Ahmednagar Savedi Naka** Chhatrapati Bajaj 8087203861 • **Kopargaon** Shirode Bajaj 9921009952, • **Rahuri** Shirode Bajaj 9921009953 • **Shrirampur** Shirode Bajaj 9270468998 • **Sangamner** MALPANI BAJAJ 9850112036, 02425-2225031

# थोडक्यात...

## एण्ड टीव्ही तर्फे प्रेक्षकांसाठी मनोरंजन

**छत्रपती संभाजीनगर** : घरवाली पेडवाली, भाबीजी घर पर है २.० आणि हप्पू की उलटन पलटन या लोकप्रिय मालिकांद्वारे एण्ड टीव्ही प्रेक्षकांसाठी या आठवड्यात मनोरंजनाचा उच्चांक गाठणार आहे. 'घरवाली पेडवाली'मध्ये जादुई घटनांमुळे नातेसंबंधांवर परिणाम होणार असून, 'भाबीजी घर पर है २.०'मध्ये रहस्यमय गुंतवणूक आणि जादुई चष्म्यांमुळे विनोदी गोंधळ निर्माण होईल. तर 'हप्पू की उलटन पलटन'मध्ये मुलांच्या खोट्या कहाण्यांमुळे अपहरणाचा थरार उलगडणार आहे. या मालिका सोमवार ते शुक्रवार रात्री ९.३०, १०.०० आणि १०.३० वाजता एण्ड टीव्हीवर, तसेच झी ५ वर उपलब्ध आहेत.

## उन्हाळ्यात कन्फर्मटीकेटसह ट्रेन प्रवास अधिक फायदेशीर बनवा

**पुणे :** कन्फर्मटीकेट, भारतातील आघाडीचे अधिकृत बी२सी ऑनलाइन ट्रेन तिकीट आणि प्रवास उपयुक्तता प्लॅटफॉर्म,इक्सीगो ग्रुपमध्ये सामील व्हा. उन्हाळी हंगामाच्या अनुषंगाने, कन्फर्मटीकेटने मर्यादित कालावधीसाठी १% कॅशबॅक ऑफरची घोषणा केली आहे. कन्फर्मटीकेट ॲपवर ट्रेन तिकिटे बुक करणाऱ्या वापरकर्त्यांना त्यांच्या कन्फर्मटीकेट वॉलेटमध्ये थेट १% कॅशबॅक मिळेल. या कॅशबॅकवर कोणतीही कमाल मर्यादा नाही, म्हणजेच वापरकर्ते त्यांना हवे तितके कॅशबॅक दावा करू शकतात. ही ऑफर ३१ मे २०२६ पर्यंत संपूर्ण उन्हाळी प्रवास हंगामात चालेल.

## झेनडेस्कने पुण्यात उभारले इनोव्हेशन हब

**पुणे :** झेनडेस्कने आज पुण्यात संशोधन आणि विकासासाठी (आर अँड डी) 'इनोव्हेशन हब'च्या उद्घाटनाची घोषणा केली. ही घोषणा कंपनीच्या भारतातील विस्ताराच्या तसेच जागतिक उत्पादन विकास टीमच्या वाढीतील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. प्रतिभेचे नवीन स्रोत वाढवणे आणि जागतिक टीम्समधील समन्वय बळकट करणे, या झेनडेस्कच्या धोरणाचा एक भाग म्हणून झेनडेस्क पुणे इनोव्हेशन हब ('पुणे हब' किंवा 'हब') स्थापन करण्यात आले आहे. पुणे आता कंपनीच्या जागतिक विकास केंद्रांपैकी एक बनले असून, जगभरातील कामकाजाचा भाग म्हणून या टीमचा आकार आणि महत्त्व अधिक वाढणार आहे.झेनडेस्कच्या रिझोल्यूशन प्लॅटफॉर्मवर केंद्रित असलेल्या एआय-सक्षम (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) सोल्यूशन्समध्ये कंपनीचे नेतृत्व अधिक भक्कम करण्यात झेनडेस्कचे पुणे हब महत्त्वाची भूमिका बजावेल. पुणे हब एक परिपूर्ण इनोव्हेशन केंद्र म्हणून काम करते. यामध्ये प्रॉडक्ट मॅनेजमेंट, युएक्स डिझाईन, इंजिनिअरिंग आणि सर्व्हिस रिलायबिलिटी इंजिनिअर्स यांसारख्या विविध विभागांचा समावेश आहे. हे विभाग या हबला स्वतंत्र आणि संपूर्ण जबाबदारीसह जागतिक स्तरावरील योजना (रोडमॅप) राबवण्यासाठी सक्षम करतात.

## आईकू १५आर लॉँच

**नवी दिल्ली :** उच्च-कार्यक्षमता स्मार्टफोन ब्रँड आईकू ने आज आईकू १५आर लॉँच केला. हा स्मार्टफोन फ्लॅगशिप-लेव्हल पॉवर आणि परफेक्ट-फिट डिझाइन एकत्र करतो जो दैनंदिन वापरासाठी संपूर्ण आराम प्रदान करतो. तरुण व्यावसायिकांना लक्षात घेऊन डिझाइन केलेले, आईकू १५आर हे अशा लोकांसाठी डिझाइन केले आहे जे काम, गेमिंग आणि मनोरंजनामध्ये सहजतेने स्विच करतात, शक्तिशाली कामगिरी, दीर्घकाळ टिकणारी बॅटरी लाइफ आणि एक आश्र्चर्यकारक दृश्य अनुभव देतात. त्याचा ६.५९-इंचाचा डिस्प्ले एका हाताने वापरण्यासाठी देखील अंतर्ज्ञानी आणि आरामदायी आहे.

## अत्याधुनिक वैद्यकीय पद्धतींचा वापर करून यशस्वी शस्त्रक्रिया

**पुणे :** उजव्या अंडाशयामध्ये मोठी गाठ आढळलेल्या ५६ वर्षीय महिलेवर मेडिकव्हर केएलई हॉस्पिटल, पुणे येथे अत्याधुनिक वैद्यकीय पद्धतींचा वापर करून यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. रुग्णावर एक्सप्लोरेटरी लॅपरोटॉमीसह सॅल्पिंगो-ओओफोरेक्टॉमी आणि सविस्तर सर्जिकल स्टेजिंग प्रक्रिया सुरक्षितपणे पार पाडण्यात आली. ही महत्त्वाची शस्त्रक्रिया डॉ. आशिष शाहुराव बांगर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. या प्रक्रियेमध्ये स्त्रीरोग तज्ज्ञ, अंतर्गत औषधोपचार तज्ज्ञ तसेच भूलतज्ज्ञ यांचा समन्वय साधत बहुवैद्यकीय पद्धतीने उपचार करण्यात आले. शस्त्रक्रियेदरम्यान बाधित अंडाशय व फलोपियन ट्यूब पूर्णपणे काढून टाकण्यात आली. त्याचबरोबर पेरिटोनियल साइटोलॉजीसाठी नमुने घेण्यात आले तसेच रोगाचा फैलाव तपासण्यासाठी आवश्यक त्या स्टेजिंग बायोप्सी करण्यात आल्या.

# एमजीएममध्ये 'नॅशनल क्राईम सीन इन्वेस्टिगेशन' स्पर्धेचे उद्घाटन संपन्न

## राष्ट्रीय स्पर्धेत देशभरातील १७४ संघांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. २४ फेब्रुवारी :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या फॉरेन्सिक सायन्स विभाग आणि गिफ़्सा क्राफ्ट्स, शासकीय न्याय सहाय्यक विज्ञान संस्था छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या सीएसआय ३.० नॅशनल क्राईम सीन सिन इन्वेस्टिगेशन स्पर्धा आणि कार्यशाळेचे मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत रुक्मिणी सभागृह येथे उद्घाटन संपन्न झाले.

यावेळी अपर पोलीस अधीक्षक श्रीमती अन्नपूर्णा सिंग, एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ.प्राप्ती देशमुख, विभागप्रमुख डॉ.मोईनुद्दीन सिद्दीकी, शासकीय न्याय सहाय्यक विज्ञान संस्थेचे डॉ.राजेश कुमार, डॉ.डी.डी. गायकवाड, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना अपर पोलीस अधीक्षक श्रीमती अन्नपूर्णा सिंग म्हणाल्या, या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष क्राईम सीन इन्वेस्टिगेशन शिकण्याची संधी मिळत आहे. सक्षम इन्वेस्टिगेशन टीम घडविण्यासाठी अनुभवासोबत लॉजिकल थिंकिंग आवश्यक असते. महाराष्ट्र राज्यात जिल्हा आणि तालुका स्तरावर स्टेट फॉरेन्सिक व्हॅनची सुविधा उपलब्ध असून त्यामुळे तपास अधिक प्रभावीपणे करता येत आहे. या कार्यशाळेत एआय इन क्राईम सीन मॅनेजमेंटचा समावेश करण्यात आला आहे. येथे विद्यार्थ्यांना सक्षमपणे घडवले जात असून त्यांच्या मांडलेल्या कल्पना कल्पना राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर वापरल्या जातील, असा विश्वास मला वाटतो.

सायन्स, टेक्नॉलॉजी अँड इन्वेस्टिगेशन यांचा संगम या स्पर्धेच्या माध्यमातून घडून आला आहे. या उपक्रमात मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी झाले असून त्यांच्या उत्साहातून संशोधन आणि नवकल्पनांची दिशा स्पष्ट होते. विद्यार्थ्यांनी विद्यापीठातील विविध विभागांना भेट देऊन आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती घ्यावी, प्रयोगशाळा व सुविधा प्रत्यक्ष पाहाव्यात आणि ज्ञानासोबत अनुभवही समृद्ध करावा, असे यावेळी कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ यांनी सांगितले.

कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर यावेळी बोलताना म्हणाले, या स्पर्धेच्या माध्यमातून फॉरेन्सिक सायन्ससंदर्भात विद्यार्थ्यांना शिकण्याची मोठी संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. क्राईम केसेसच्या अभ्यासातून तपासाची पद्धत, बारकावे आणि जबाबदारीची जाणीव विकसित होते. विद्यार्थ्यांनी आपल्याला मिळालेला प्रत्येक बाबीकडे कुतुहलाने आणि बारकाईने पाहणे आवश्यक असून प्रश्र्न विचारण्याची वृत्ती आणि निरीक्षणशक्ती वाढविणे हेच



खरे शिक्षण आहे.

विद्यार्थ्यांना नोकरीसाठी तयार करण्याचे काम आम्ही या माध्यमातून करीत आहोत. सीएसआय ३.० मध्ये देशभरातील १० पेक्षा अधिक राज्यातून १७४ संघ या राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झाले आहेत. त्याचप्रमाणे या कार्यशाळेत आंतरराष्ट्रीय स्तरावरील तज्ज्ञ मान्यवर सहभागी झाले असल्याचे डॉ. राजेश कुमार यांनी यावेळी सांगितले.

या उद्घाटन सोहळ्यात डॉ.एस.जी. गुप्ता यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यशाळेत शॉर्ट फिल्म स्पर्धा आणि पोस्टर प्रदर्शन आदि कार्यक्रम होणार आहेत.

## बुलढाणा अर्बन चॅरिटेबल संस्थेच्या अध्यक्षा कोमल झंवर यांची सिल्लोड विभागीय कार्यालय तथा शाखा कार्यालयाला सदिच्छा भेट

**तभा.वृत्तसेवा**

**सोयगाव,दि.२४ फेब्रुवारी :** बुलढाणा अर्बन चॅरिटेबल संस्थेच्या अध्यक्ष कोमल झंवर यांची सिल्लोड विभागीय कार्यालय तथा शाखा कार्यालयाला सदिच्छा भेट संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राधेश्यामजी चांडक भाईजी,संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुकेशजी झंवर यांच्याच बरोबरीला सहकार्यातून शैक्षणिक क्षेत्र विकसित करावयाचा ध्यास मनी बाळगून सहकार विद्या मंदिराची धुरा,समर्थपणे सांभाळीत असलेल्या कोमल झंवर यांनी दि.२४ मंगळवार रोजी सकाळी सिल्लोड विभागीय कार्यालय व शाखा कार्यालयला भेट दिली त्यांच्या समावेत संस्थेचे सनदी लेखापाल विशाल तोतला जळगाव यांच्या पत्नी पल्लवी तोतला यांचे संजय दळवी विभागीय व्यवस्थापक,सिल्लोड गजानन झाल्टे वरिष्ठ शाखा व्यवस्थापक व अनिल बोर्डे विभागीय लेखापरीक्षक यांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन आदर सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी कोमल झंवर यांनी शाखा व विभागातील ठेवी कर्ज एनपीए व इतर उपक्रमाबाबत सविस्तर आढावा घेऊन संस्थेचे स्वमालकीचे छत्रपती संभाजीनगर-जळगाव मुख्य रस्त्यावरील प्रशस्त इमारतीत असलेल्या कार्यालयाचे कौतुक करून सर्व कर्मचारी यांचे पूर्ण चौकशी करून माहिती जाणून घेतली शाखा व विभागीय कार्यालय लॉकर्स सुविधा व स्वच्छता बघून समाधान व्यक्त केले.यावेळी शाखेतील सर्व




कर्मचारी यांनी ही कोमल झंवर यांचे स्वागत करून आस्थेने चौकशी व शाखेला भेट दिल्याबद्दल सर्वांनी आभार मानले.

## बिडकीन येथे संत गाडगेबाबा यांची १५० वी जयंती साजरी

***तभा वृत्तसेवा***

***बिडकीन, दि. २४ फेब्रुवारी :***

*पैठण तालुक्यातील बिडकीन येथे संत गाडगेबाबा यांची १५० वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सोमवार, दि. २३ रोजी सकाळी १० वाजता सोनार गल्ली, मेनरोड बिडकीन येथील राहुल शिंदे यांच्या घरासमोर गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या प्रसंगी जि. प. सदस्य मनोज पेरे, सरपंच अशोक धर्मे, माजी जि. प. सदस्य व भाजप तालुका अध्यक्ष विजय चव्हाण, किसनलाल तोतला, प. स. सदस्य अक्षय गवारे आदी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर सजवलेल्या रथातून मिरवणूक काढण्यात आली. गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला या प्रेरणादायी गीतांसह व गाडगेबाबा यांच्या जयघोषात मिरवणूक उत्साहात पार पडली. मिरवणूक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ जाऊन महाराजांना अभिवादन करण्यात आले. त्यानंतर जयघोष करत मिरवणूक संत गाडगेबाबा प्रतिष्ठान येथे सजविण्यात आलेल्या कार्यक्रमस्थळी पोहोचली. कार्यक्रमस्थळी विविध वक्त्यांनी गाडगेबाबा यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. सरपंच अशोक धर्मे, ग्रामपंचायत सदस्य रमेश शिंदे, स्वप्नील बाराहाते आदींनी गाडगेबाबा यांच्या जीवनचरित्राविषयी सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच अशोक धर्मे तर प्रमुख पाहुणे म्हणून ढगे सर उपस्थित होते. संदीप गायकवाड यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले. यानंतर ग. भा. मीराबाई रामनाथ शिंदे यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बिडकीन व परिसरातील धोबी (परीट) समाजातील लहान-थोर, महिला व पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.*



# सोयगावात तिथीप्रमाणे साजरा होणार शिवजन्मोत्सव; शिवजयंती उत्सव समिती कार्यकारणीची निवड जाहीर

**तभा वृत्तसेवा**

**सोयगाव, दि. २४ फेब्रुवारी :**

छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती फाल्गुन वद्य तृतीया म्हणजेच येत्या ६ मार्च रोजी सोयगाव शहरात तिथीप्रमाणे मोठ्या उत्साहात साजरी केली जाणार आहे. या निमित्ताने आयोजित बैठकीत 'शिवजन्मोत्सव समिती २०२६' ची नवीन कार्यकारणी सर्वानुमते जाहीर करण्यात आली असून,समितीच्या अध्यक्षपदी सागर इंगळे तर सचिवपदी निलेश नागपुरे यांची निवड करण्यात आली आहे.समर्पण फाउंडेशनच्या कार्यालयात पार पडली. ही बैठक सोयगाव येथील समर्पण फाउंडेशनच्या कार्यालयावर शुक्रवार दि.२० रोजी सायंकाळी ८:०० वाजता तालुक्यातील विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक समर्पण फाउंडेशनचे हर्षल फुसे यांच्या



अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली असून आगामी शिवजन्मोत्सवाच्या नियोजनावर सविस्तर चर्चा करण्यात आली आणि समितीची घोषणा करण्यात आली.

समितीच्या अध्यक्षपदी सागर इंगळे तर उपाध्यक्षपदी संतोष औरंगे व दीपक कोरडे,सचिवपदी निलेश नागपुरे तर सहसचिवपदी प्रताप राजपूत व संकेत बैरागी आणि कार्याध्यक्षपदी राहुल फुसे आणि रवी गिरी यांची निवड झाली आहे.कोषाध्यक्षपदी सोपान आगे राहणार असून, संघटक म्हणून पवन पाटील व दीपक सोनवणे यांची निवड करण्यात आली.तसेच प्रसार माध्यमांची जबाबदारी विशाल राजपूत आणि यश वामने यांच्यावर सोपवण्यात आली आहे.सदस्यपदी प्रथमेश निकम, सागर कोथलकर,योगेश चव्हाण, श्रीअनंत मिसाळ, सुदर्शन बारी, स्वप्नील आगे, सुरेश ढगे, गोपाल बावस्कर, निलेश कोथलकर, प्रणव ताडे यांची निवड करण्यात आली.

### पारंपरिक उत्सवावर भर आणि निधीबाबत महत्त्वपूर्ण निर्णय

यावर्षीचा शिवजन्मोत्सव पूर्णपणे पारंपरिक पद्धतीने साजरा केला जाणार आहे.उत्सवाचे मुख्य आकर्षण छत्रपती शिवाजी महाराजांची पालखी,सुंदर देखावे, ढोल-ताशांचा गजर आणि लेझीम पथक हे असणार आहे.विशेष म्हणजे,या उत्सवासाठी खर्च केवळ समितीमधील पदाधिकारी आणि सदस्य स्वतः मिळून करणार आहेत.

### वेताळवाडी किल्ल्यावर पायी पालखी सोहळा आणि गडकोट मोहीम

यावर्षीच्या उत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे सोयगाव ते वेताळवाडी किल्ला असा आयोजित करण्यात आलेला भव्य पायी पालखी सोहळा.तालुक्यातील शेकडो तरुण धारकरी या सोहळ्यात सहभागी होऊन वेताळवाडी किल्ल्यावर 'पायी गडकोट मोहीम' राबवणार आहेत. गडकोटांचे जतन आणि तरुणांमध्ये इतिहासाची जाणीव जागृत करणे, हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे अशी माहिती समर्पण फाउंडेशनचे अध्यक्ष हर्षल फुसे यांनी दैनिक तरुण भारत शी बोलतानी माहिती दिली.

## हळदा येथे कर्जबाजारीपणाला कंटाळून शेतकऱ्यांची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**

**अजिंठा, दि. २४ फेब्रुवारी :** सततची नापिकता व कर्जबाजारीपणाला कंटाळून शेतकऱ्याने विषारी किटक औषधी प्राशन करुन आत्महत्या केल्याची घटना सोमवार ( दि.२३) रोजी सकाळी १० च्या सुमारास हाळदा ( ता.सिल्लोड ) येथे घडली. तायराम गणपतराव गवळे ( वय ७०) असे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे.या बाबत सविस्तर माहिती अशी की,मयत शेतकरी यांची गट क्र.३१ डकला शिवारात शेती आहे.याच ठिकाणी पत्राच्या वखारीत मंगळवारी सकाळी दहाच्या सुमारास वखारीत कोणी नसतांना मयत तायराम गवळे यांनी विषारी किटक औषधी प्राशन केले.ही गोष्ट नातु व इतरांच्या लक्षात येताच आरडा ओरडा केला. नातेवाईक व इतरांच्या मदतीने तात्काळ त्यांना उपजिल्हा रुग्णालय सिल्लोड येथे उपचारासाठी दाखल केले असता,उपचारा दरम्यान रात्री साडे सातच्या सुमारास शेतकऱ्याची प्राणज्योत मालवली.मयत शेतकऱ्याने बँक ऑफ बडोदा शाखा उंडणगांव येथुन तसेच बुलडाणा अर्बन बँकेतुन सोने तारण कर्ज घेतलेले आहे. सततची नापिकता व बँकेकडुन घेतलेले कर्जच्या विवंचेतुन शेतकऱ्याने जीवन संपवले.मृत शेतकऱ्याच्या पश्र्चात पत्नी,मुलगा,सुना, नातवंडे असा परिवार आहे.या प्रकरणी अजिंठा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली.मृताचे उपजिल्हा सिल्लोड रुग्णालयात शवविच्छेदन करुन प्रेत नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले आहे.बीट जमादार संतोष पाईकराव,दिलीप तडवी ,रविंद्र बागुलकर घटनेचा तपास करत आहे.




## कार्यालय नगर परिषद पैठण

### जिल्हा. छत्रपती संभाजीनगर

जा/नपपै.क्र./जाहिरात/२८२/२०२६ दिनांक - २४/०२/२०२६

### जाहीर प्रगटन

याद्वारे सर्व सबंधित नागरिक, संस्था, जाहिरातदार व राजकीय पक्ष यांना जाहीर करण्यात येते कि, कार्यालय नगर परिषद हद्दीतील विजेचे खांब, रस्त्यांच्या कडेला, सार्वजनिक ठिकाणी तसेच कोणत्याही धोकादायक किंवा जोखमीच्या जागेवर अनधिकृतपणे लावण्यात आलेले होर्डिंग, बॅनर, पोस्टर, शुभेच्छा फलक इत्यादी संबंधितांनी स्वतःहून २४ (चोवीस) तासांच्या आत काढून घ्यावेत, निर्विष्ट मुदतीत अनधिकृत साहित्य न काढल्यास संबंधितांवर खालील कायद्यानुसार फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल.

महाराष्ट्र मालमत्ता विद्रुपीकरण प्रतिबंध अधिनियम, १९९५ चे कलम ३ याशिवाय, अशा अनधिकृत होर्डिंग/बॅनरमुळे कोणतीही जीवितहानी किंवा अपघात झाल्यास सबंधित व्यक्ती/संस्था यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात येईल, याची सर्वांनी गंभीर नोंद घ्यावी.

आदेशानुसार

स्वाक्षरीत/-
**(डॉ. पल्लवी अंभोरे)**
**नगर परिषद पैठण**

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

कि.दि.अर्ज क्र. १३५/२०२६

अर्जदार:-१) प्रमोद नागनाथ जाधव, वय ४८ वर्षे धंदा नौकरी, रा. साबणे टॉकीज जवळ, लक्ष्मी कॉलनी, गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) योगेश नागनाथ जाधव, वय ४२ वर्षे धंदा वकीली रा. साबणे टॉकीज जवळ, लक्ष्मी कॉलनी, गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार-निरंक

प्रकरण:-हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ श्री. रविराज बी. दारुंटे यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.१ व २ हे आपसांत ने सख्खे भाऊ असुन अर्जदार क्र.१ व २ यांची आई नामे कमलबाई नागनाथ जाधव या गंगापुर जि छत्रपती संभाजीनगर येथील कायमच्या रहिवाशी होत्या, त्या दिनांक १५/११/२०२५ रोजी वैद्यकीय उपचारादरम्यान हेडगेवार रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेल्या आहे. तसेच अर्जदारांचे वडील नामे नागनाथ गंगानाथ जाधव हे यापुर्वीच सालसन १९९४ मध्ये मयत झालेले आहे. मयत कमलबाई नागनाथ जाधव यांना अर्जदार क्र.१ व २ हेच कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयत कमलबाई नागनाथ जाधव यांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार करीता मयताचे मृत्युपश्र्चात शासकीय-निमशासकीय व इतर कार्यालयीन कामासाठी बारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने या मा. न्यायालयात सदरचा अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील.करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक २४/०२/२०२६ रोजी दिले. प्रकरणात तारीख दिनांक ३०/०३/२०२६ रोजीची आहे.

**वरीष्ठ / कनिष्ठ लिपीक.** **सहाय्यक अधिक्षक, दिवाणी न्यायालय गंगापुर**

### जाहीर प्रगटन/सायटेशन नोटीस

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

कि.दि.अर्ज क्र.६०/२०२६

अर्जदार :-१) चंद्रभान देवराव भुजंग, वय ६५ वर्ष, धंदा शेती, रा. जोगेश्र्वरी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) संजय देवराव भुजंग, वय ४७ वर्ष, धंदा शेती,रा. जोगेश्र्वरी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) बेबी पोपट गायकवाड, वय ४८ वर्षे, धंदा घरकाम रा. वॉर्ड क्र.३, खळवाडी परिसर, वडाळा महादेव, ता. श्रीरामपुर जि. अहिल्यानगर ४) अरुणा भ्र. योहान जावळे, वय ४७ वर्षे, धंदा घरकाम रा. देवी रांजणगाव ता. नेवासा जि. अहिल्यानगर

विरुध्द

गैरअर्जदार:- सुशिला ज्ञानदेव गरड, वय ५० वर्षे, धंदा घरकाम, रा. हनुमान मंदिरामागे, विकास हौसिंग सोसायटी, तळवडे, पुणे

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ड. श्री. वाय एन जाधव यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की अर्जदार क्र.१ ते ४ व गैरअर्जदार हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ व बहिणी असुन अर्जदार क्र.१ ते ४ व गैरअर्जदार यांचे वडील नामे देवराव कचरु भुजंग हे मौजे जोगेश्र्वरी ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते दिनांक ०७/०९/२०२२ रोजी मौजे कोळघर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झाले असुन अर्जदार क्र.१ ते ४ व गैरअर्जदार यांची आई व मयत देवराव कचरु भुजंग यांची पत्नी नामे सुलाबाई देवराव भुजंग या दिनांक २७/०८/२०२४ रोजी मयत झालेल्या आहे. गैरअर्जदार ही देखील मयतांची कायदेशीर वारसदार असुन ती प्रकरणात सही करण्यास नकार देत असल्याने तिस प्रकरणात गैरअर्जदार म्हणुन समाविष्ट केलेले आहे. मयत देवराव कचरु भुजंग यांना अर्जदार क्र.१ ते ४ आणि गैरअर्जदार हेच कायदेशीर वारसदार असुन त्यांच्या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे सांगुन शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राचीआवश्यकता असल्याने या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदाराच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. प्रकरणात पुढील तारीख दिनांक ०७/०३/२०२६ रोजीची आहे. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक १६/०२/२०२६ दिले.

**वरीष्ठ/कनिष्ठ लिपीक.** **सहाय्यक अधिक्षक, दिवाणी न्यायालय गंगापुर**

जा. क्र. नं.3/886/2026
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर
दि. 17.02.26

### चौकशीची जाहीर नोटीस

**सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर,**
**चौकशी अर्ज क्रमांक में.३/७३४/२०२५ - कलम : १९**

**न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक: निळकंठेश्वर व साईवाचा चॅरीटेबल ट्रस्ट, छत्रपती संभाजीनगर बाबत...**

**अर्जदार : श्री. सोताराम बन्सी पवार**

**सर्व संबंधित लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि. सहाय्यक धर्मादाय आयुक्त छत्रपती संभाजीनगर विभाग छत्रपती संभाजीनगर हे वर नमूद केलेल्या अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वत व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुददयावर चौकशी करणार आहेत.**

**१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय आणी सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?**

**२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत न्यासाच्या मालकीची आहे काय?**

**अ) जंगम मालमत्ता (वर्णन) ३५००/-.**

**ब) स्थावर मिळकत (वर्णन) काही नाही.**

**सदर चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असल्यास अगर पुरावा देणेचा असल्यास त्यांनी लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन तीस दिवसांचे आत या कार्यालयात वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजुन चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.**

**ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचे शिक्यानिशी आज दिनांक १७/०२/२०२६ रोजी दिली असे.**

**स्वाक्षरीत/-**
**न्यायशाखा (अधिक्षक)**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर.**

## संक्षिप्त वृत्त...

### कर निर्धारण स्थगितीसाठी नगराध्यक्षांचा पुढाकार

**मानवत,/प्रतिनिधी:-** मानवत नगर परिषदेकडून आयोजित विशेष सर्वसाधारण सभेच्या पत्राच्या अनुषंगाने शहरातील मालमत्ता कर निर्धारण प्रक्रियेबाबत मोठी घडामोड घडत आहे. गेल्या ३५ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मालमत्ता कर निर्धारणामुळे मानवतकरांवर पडलेला तब्बल १७ ते १९ पट आर्थिक बोजा आता कमी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. नागरिकांमध्ये वाढत चाललेला संताप लक्षात घेता नगराध्यक्ष राणीताई अंकुश लाड यांनी २७ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता विशेष सर्वसाधारण सभेचे आयोजन केले आहे. या सभेचा मुख्य अजेंडा करवाढीला स्थगिती देणे हा आहे. नगर परिषदेकडून नगरसेवकांना देण्यात आलेल्या निमंत्रण पत्रिकेनुसार या सभेमध्ये सन २०२६-२७ ते २०२९-३० या कालावधीसाठी लागू करण्यात आलेल्या चौथ्या वार्षिक फेर मूल्यमापन कर आकारणीस स्थगिती देण्याबाबत चर्चा होणार आहे. प्रशासक काळात घेतलेल्या या निर्णयामुळे सर्वसामान्यांचे आर्थिक नियोजन कोलमडले असून नागरिकांनी मोठ्या प्रमाणात आक्षेप नोंदविले आहेत. नगराध्यक्षांनी प्रशासनाशी चर्चा करत प्राप्त सर्व हरकती नगररचना विभागाकडे पाठविण्याचे निर्देश दिले आहेत. नगररचना विभागाच्या अहवालानंतरही समाधान न झाल्यास संबंधित प्रकरणे अपिलीय समितीकडे वर्ग करण्याची भूमिका त्यांनी स्पष्ट केली. त्यामुळे नागरिकांना कायदेशीर मार्गाने न्याय मिळण्याची संधी उपलब्ध होणार आहे. उपनगराध्यक्ष अंकुश लाड यांनी यापूर्वीच लोकहित जपून तोडगा काढण्याचे आश्वासन दिले होते. त्यादृष्टीने हा स्थगितीचा प्रस्ताव महत्त्वाचा मानला जात आहे. करवाढी व्यतिरिक्त या सभेत मानवत शहरासाठी नागरी अग्निशमन बळकटीकरण योजनेअंतर्गत नवीन अग्निशमन वाहने खरेदी करण्यास मंजुरी मिळवण्याबाबतही चर्चा होणार आहे. दरम्यान, विशेष सभा होणार असली तरी नागरिकांनी आपले लेखी आक्षेप वेळेत नोंदविणे अत्यंत गरजेचे असल्याचेही आवाहन करण्यात आले आहे. आक्षेप नोंदविल्यासच त्यांची दखल अधिकृतपणे घेतली जाऊन पुढील कार्यवाही करता येणार असल्याने नागरिकांनी निष्क्रीय न राहता प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन लोकप्रतिनिधींनी केले आहे. प्रशासकीय त्रुटींमुळे ३५ वर्षांचा बॅकलॉग वसूल करण्याच्या प्रयत्नांना आता लोकप्रतिनिधींच्या सभेत खीळ बसते का, हे २७ फेब्रुवारीला स्पष्ट होणार असून मानवतकरांचे लक्ष या सभेकडे लागले आहे.

### शिवाजी महाराजांची आदर्श कुटुंबव्यवस्था व स्त्रीसन्मानाची भूमिका आजही प्रेरणादायी

**पाथरी,/प्रतिनिधी:-** शिवाजी महाराजांनी उभारलेली आदर्श कुटुंबव्यवस्था, स्त्रीसन्मानाची भूमिका आणि सामाजिक समन्वयाची तत्त्वे आजही मार्गदर्शक आहेत, असे प्रतिपादन विश्वास दिवाळकर यांनी केले.

नूतन विद्या समिती संचलित मराठवाडा हायस्कूल येथे गुरुवार २० फेबुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. देशभक्ती, स्वाभिमान आणि इतिहासाची जाणीव जागवणारा हा सोहळा उत्साहात व दिमाखात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सहसचिव व मुख्याध्यापक प्राचार्य अनंत पांडे विराजमान होते. प्रमुख वक्ते म्हणून दिवाळकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी प्राथमिक मुख्याध्यापिका सौ. ढगे, पर्यवेक्षक सूर्यकांत पाटील, सहपर्यवेक्षक सुनील रामपूरकर, साळवे तसेच सर्व शिक्षक बंधू-भगिनी उपस्थित होते.

प्रमुख वक्ते विश्वास दिवाळकर यांनी शिवाजी महाराजांच्या जीवनकार्याचा सविस्तर आढावा घेतला. राजमाता जिजाऊ यांनी बालशिवबांना रामायण-महाभारतातील आदर्श कथा सांगून स्वराज्य, धर्मनिष्ठा आणि न्यायप्रियतेची बीजे रोवली, असे त्यांनी सांगितले. शिवरायांची युद्धनीती, गनिमी कावा, दूरदृष्टी, किल्ल्यांचे महत्त्व आणि प्रजेला दिलेले संरक्षण यावर त्यांनी प्रकाश टाकला. जाणता राजा म्हणून ओळखले जाणारे शिवाजी महाराज प्रजेच्या सुख-दुःखात सहभागी होणारे, न्यायनिष्ठ व कर्तव्यदक्ष शासक होते, असे त्यांनी नमूद केले. अफजलखान वध हा त्यांच्या धैर्य, बुद्धिमत्ता व रणनितीचा उत्कृष्ट नमुना असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच बाजीप्रभू देशपांडे यांच्या पावन बलिदानाचा उल्लेख करत स्वराज्यासाठी दिलेले त्यांचे योगदान विद्यार्थ्यांसमोर मांडले. शिवाजी महाराजांनी उभारलेली आदर्श कुटुंबव्यवस्था, स्त्रीसन्मानाची भूमिका आणि सामाजिक समन्वयाची तत्त्वे आजही मार्गदर्शक असल्याचे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य अनंत पांडे म्हणाले, शिवाजी महाराजांची जयंती हा केवळ उत्सव नसून तो आनंदोत्सव आहे. आपण जयंतीसोबत जन्मोत्सव साजरा करून त्यांच्या आदर्शांचा आपल्या दैनंदिन जीवनात अवलंब केला पाहिजे. विद्यार्थ्यांनी शिवरायांचे शौर्य, प्रामाणिकपणा, संघटनशक्ती आणि राष्ट्रप्रेम यांचा आदर्श ठेवून जीवनात प्रगती साधावी, असे आवाहन त्यांनी केले. पंचपरिवर्तन, आदर्श कुटुंबव्यवस्था, सामाजिक बांधिलकी आणि नैतिक मूल्यांचे पालन हीच खरी शिवजयंती साजरी करण्याची पद्धत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्राचार्य पांडे हे शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेणारे नेतृत्व म्हणून ओळखले जातात. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेत विविध उपक्रम राबवले जात असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य दिले जाते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल गोरकट्टे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सुनील रामपूरकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्रीपाद कुलकर्णी, शिवप्रसाद कोरे, सुनील तुरुकमाने, वसंत पुरी, गोपाल रोडे तसेच सर्व शिक्षक बंधू-भगिनी यांनी विशेष परिश्रम घेतले. शिवाजी महाराजांच्या जयघोषाने आणि देशभक्तीपर घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाबद्दल अभिमान, प्रेरणा आणि राष्ट्रनिष्ठा जागवणारा हा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

### जन्म-मृत्यू प्रमाणपत्रे पडताळणी करूनच द्यावीत; भाजप नगरसेवकांचे आयुक्तांना निवेदन : चुकीच्या प्रमाणपत्रांवर कारवाईची मागणी

**परभणी,/प्रतिनिधी :** जन्म व मृत्यू प्रमाणपत्रे देताना सखोल पडताळणी करूनच प्रमाणपत्र देण्यात यावे तसेच कोणत्याही दबावाखाली येऊन चुकीची प्रमाणपत्रे देऊ नयेत, अशी मागणी भारतीय जनता पार्टीच्या नगरसेवकांनी महापालिका आयुक्तांकडे केली आहे. नगरसेवक रितेश झांबड, सौ. गिरीजा शंकर आजेगावकर, सौ. वैशाली दैठणकर, सौ. सुशिला थोरात, सपना जुक्टे, डॉ. केदार खटींग, गणेश टाक आदींनी बुधवार १८ फेबुवारी रोजी महापालिका आयुक्तांना एक निवेदन सादर केले. त्याद्वारे, नूतन महापौर यांनी अलीकडेच जन्म-मृत्यू नोंदणी कार्यालयास भेट देऊन प्रलंबित प्रमाणपत्रांच्या बाबत अधिकाऱ्यांना विचारणा केली. प्रमाणपत्रे देण्यात होत असलेल्या दिरंगाईमुळे नागरिकांना होणारा त्रास कमी करण्याचा त्यांचा दृष्टिकोन स्वागतार्ह असल्याचे नमूद करण्यात आले आहे. मात्र, कोणतेही प्रमाणपत्र शहानिशा, कागदपत्रांची तपासणी व आवश्यक पुरावे पडताळल्याशिवाय देण्यात येऊ नये, अशी मागणी करण्यात आली आहे.यापूर्वी परभणी शहरात बांगलादेशी घुसखोरीच्या प्रकरणात हजारो व्यक्तींना प्रमाणपत्रे देण्यात आल्याचा मुद्दा राज्यभर गाजला होता.

# लहान मुलं बनत आहेत सोशल मीडियाची शिकार !

## १२ ते १७ वर्षांखालील मुलांना स्मार्टफोन चं व्यसन

**सोनपेठ,/प्रतिनिधी-** स्मार्टफोनच्या जमान्यात लहानापासून थोरांपर्यंत प्रत्येकाला स्मार्टफोनची आवड निर्माण झाली असून तास ना तास सोशल मीडियामध्ये गुरफटणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. त्यातच १२ ते १७ वर्षाखालील मुलांनाही सोशल मिडियाचे आकर्षण निर्माण झाले असून अनेक मुलं अभ्यास व संवाद सोडून या सोशल मीडियाच्या व्यसनात तास ना तास गुरफटलेले दिसून येत आहेत. त्यामुळे किमान अल्पवयीन वयातील मुलांच्या सोशल मीडिया हाताळण्यावर बंदी घालण्याची गरज निर्माण झाली आहे.




मिळेल त्या वेळेत पालकांकडील स्मार्टफोन हाताळताना अनेक मुले दिसून येत आहेत त्यातून इंटरनेटवर काही आक्षेपार्ह किंवा बरे-वाईट साहित्य असेल तर ते पाहण्याचा किंवा न पाहण्याचा पर्याय आणि अधिकार हा वैयक्तिक आहे. परंतु मुलांच्या बाबतीत यामध्ये धोका खूप जास्त असतो. त्यामुळे आई-वडिलांची जबाबदारी देखील आता वाढत चालली आहे. त्यासाठी सोळा वर्षापेक्षा कमी वयाच्या मुलांसाठी सोशल मीडियावर बंदी घालावी असे नुकतेच मद्रास उच्च न्यायालयाच्या मदुराई खंडपीठाने केंद्र सरकारला सुचविले आहे. स्मार्टफोनच्या काळात संवाद हरवला असून संवादातून मिळणारे ज्ञान आत दुरापास्त झाले आहे.

जो तो प्रत्येक जण आपल्या मोबाईल मधील व्हाट्सअप, फेसबुक, ट्विटर, ट्रेड, इंस्टाग्राम, युट्यूब यांसारख्या सोशल मीडियावर तास ना तास व्यस्त असल्याचे दिसून येत आहे. पूर्वीच्या काळी प्रामुख्याने ग्रामीण भागातील नागरीक ओसरीवर, रस्त्यावर, मंदिरासमोर, पारावर, चावडीवर, अथवा एखाद्या झाडाखाली एकत्रित घोळक्याने बसत नागरिक व मुले आपसात संवाद करत असत. तसेच शहरामध्ये चौका चौकात हॉटेलमध्ये पान टपरी समोर एकत्रित येऊन नागरिक आपसात सल्लामसलत करून विविध विषयांवर संवाद करत बसत होते. या संवादातून विचारांची देवाण-घेवाण होत असे व त्यातून एकमेकांच्या प्रश्नांना उत्तरांची वाचा फुटत असे. त्यातून अडचणींची व दैनंदिन अनेक कामं सुलभतेने होत असत व आपला वेळ आनंदाने प्रफुलित वातावरणात घालवत असत. परंतु आता पुर्विचे ते दिवस गेले आणि आपसातील संवाद हरवला आणि प्रत्येकाच्या हातात स्मार्टफोन आला त्यामुळे लहानापासून मोठ्यापर्यंत महिला व पुरुष दिवसभर त्या स्मार्टफोनमध्ये डोके खुपसून बसत असतात. त्यातून संवाद, वाचन, सल्लामसलत व आपसातील गप्पा आता दुरापास्त झाले आहे. आजच्या पिढीला स्मार्टफोन चे एक व्यसनच जडले आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. परंतु हे स्मार्टफोनचे व्यसन आता मोठ्यापर्यंत सिमीत न राहता त्याचे लोन आता अल्पवयीन मुलापर्यंत पोहोचले आहे. सध्याच्या काळात काही पालकांनी १२ ते १७ वर्षे वयोगटातील आपल्या मुलांना चक्क स्मार्टफोन घेऊन दिल्याचे दिसून येत आहे. तर काही मुलं हट्ट धरून आपल्या पालकांकडील मोबाईल घेऊन तास ना तास पाहत बसत असतात. त्यामधील अनेक आक्षेपार्ह वादग्रस्त पोस्ट पाहून त्याला प्रतिसाद देत आहेत. तर काहीजन अशा पोस्टला टिका टिप्पणी करत असतात. या कोवळ्या वयात स्मार्टफोन हाताळण्याचे वेसन जडलेल्या मुलांसह पालकांना सुद्धा भविष्यात मोबाईल व्यसन मुक्ती केंद्रात दाखल करण्याची आवश्यकता भासू लागेल. सध्याच्या काळात स्मार्टफोन मध्ये गुरफटलेली अनेक मुलं शिक्षणात मागे राहिल्याचे दिसून येत आहे. यासाठी निदान अल्पवयीन बालकांना तरी शासनानेच स्मार्टफोन वापरण्यासाठी काही निर्बंध लावण्याची गरज निर्माण झाली आहे.

### राज्यातील मुदती संपलेल्या ग्रामपंचायतींवर विद्यमान सरपंचांची प्रशासक पदावर म्हणून नेमणूक करण्याचा राज्य शासनाचा महत्त्वपूर्ण निर्णय

**जिंतूर,/प्रतिनिधी :** जिल्हा परिषद व्यवस्थापन अंतर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांचे शारीरिक, मानसिक, भावनिक आरोग्य चांगले राहावे या दृष्टिकोनातून जिल्हा परिषद परभणी च्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतिषा माथुर यांच्या संकल्पनेतून आणि उप मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप घोन्सीकर यांच्या नियोजन मधून क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या सर्व स्पर्धा बीटस्तर, तालुकास्तर व जिल्हा स्तरावर संपन्न झाल्या.

जिंतूर पंचायत समिती चे गटविकास अधिकारी सुभाष मानकर यांनी अतिशय नियोजनबद्ध बीटस्तर व तालुकास्तर स्पर्धा घेऊन क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेमध्ये नैपुण्य प्राप्त असणाऱ्या स्पर्धकांची व कलाकारांची निवड केली. क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा यांचा सराव करण्यासाठी व्यवस्थित नियोजन करून सर्व स्पर्धक व सांस्कृतिक स्पर्धेत सहभागी होणाऱ्या कलाकारांना पुरेसा वेळ उपलब्ध करून दिला. प्रत्यक्ष होणाऱ्या सरावाचे निरीक्षण केले. क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेच्या सरावामध्ये क्रीडा प्रकारात व सांस्कृतिक प्रकारात नैपुण्य व कौशल्य दाखविणाऱ्यावर बारकाईने लक्ष ठेवून अंतिम जिल्हा स्तरावर क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेसाठी जिंतूर पंचायत समिती अंतर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांची योग्य निवड केली. या कार्यामध्ये गटशिक्षणाधिकारी त्र्यंबक पोले यांनी शिक्षण विभागा अंतर्गत कार्यरत स्पर्धक व कलाकार यांच्या समन्वयासाठी विशेष प्रयत्न केले.

दिनांक १७ व १८ फेब्रुवारी २०२६ रोजी परभणी येथे संपन्न झालेल्या जिल्हास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेमध्ये जिंतूर पंचायत समितीने सर्वच क्रीडा प्रकारात व सांस्कृतिक प्रकारात आपला उल्लेखनीय सहभाग नोंदवला. एवढेच नव्हे तर वैयक्तिक क्रीडा प्रकारात व सामुहिक क्रीडा प्रकारात जिंतूर तालुक्याने भरीव यश संपादन केले. यामध्ये रस्सीखेच, बॅडमिंटन, खो-खो, कबड्डी, क्रिकेट, धावणे, गोळा फेक, चालणे या विविध क्रीडा प्रकारात प्रथम क्रमांक मिळवला. तर सांस्कृतिक स्पर्धेतही जिंतूरने आपली उल्लेखनीय कामगिरी नोंदवत गीत गायन वैयक्तिक नृत्य, समूह नृत्य, हास्यजत्रा यामध्ये वेगवेगळे क्रमांक मिळवले स्वतः गटविकास अधिकारी सुभाष मानकर यांनी उत्कृष्ट गीत गायन करत प्रथम क्रमांक मिळवला.

### परभणी जिल्ह्याच्या पालक सचिवपदी तुकाराम मुंढे यांची नियुक्ती : सामान्य प्रशासन विभागाद्वारे आदेश जारी

**परभणी,/प्रतिनिधी:** परभणी जिल्ह्याच्या पालक सचिवपदी तुकाराम मुंढे यांची नियुक्ती : सामान्य प्रशासन विभागाद्वारे आदेश जारी करण्यात आले आहे.



परभणी जिल्ह्याच्या पालक सचिव म्हणून राज्याच्या दिव्यांग कल्याण विभागाच्या सचिव तथा कर्तव्यदक्ष अधिकारी तुकाराम मुंढे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

राज्याच्या सामान्य प्रशासन विभागाने सोमवारी (दि.२३) सहा जिल्ह्यातील पालक सचिवांच्या नियुक्त्यां संदर्भातील एक अध्यादेश जारी केला. त्याद्वारे परभणी जिल्ह्याच्या पालक सचिवपदी मुंढे यांची नियुक्ती केली. यापूर्वी या जिल्ह्याच्या पालक सचिव म्हणून जिल्हा संपदा विभागाचे अप्पर मुख्य सचिव दिपक कपुर हे कार्यरत होते. आता दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव मुंढे हे पालक सचिव म्हणून जबाबदारी स्विकारणार आहेत. या अध्यादेशात गडचिरोली, वर्धा, मुंबई शहर, वाशीम व रत्नागिरी येथील पालक सचिवांच्याही नव्याने नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

## २५ हजारांची लाच मागितल्या प्रकरणी होमगार्ड कार्यालयातील तीघे ताब्यात : लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई

**परभणी/प्रतिनिधी - :** परभणी येथील जिल्हा समादेशक होमगार्ड कार्यालयातील पदोन्नती प्रकरणात २५ हजार रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सोमवारी (दि.२३) तीघा जणांना ताब्यात घेतले.

येथील लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रारदाराने या प्रकरणी २० फेब्रुवारी रोजी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांना ३१ डिसेंबर २०२५ रोजी पलटण नायक पदाची पदोन्नती देण्यात आली होती. या पदोन्नतीबदल्यात बक्षीस म्हणून २५ हजार रुपयांची मागणी करण्यात आली. या प्रकरणात केंद्रनायक (गट क) नानासाहेब गणपतराव मोखडे, प्रशासकीय अधिकारी (गट क) माणिक शंकरराव वाडेकर आणि वरिष्ठ पलटण नायक (गट क) ज्ञानोबा बाबुराव लटपटे यांनी संगनमताने रक्कम मागितल्याचे नमूद करण्यात आले. यापैकी ८ हजार रुपये तक्रारदाराकडून यापूर्वी फोन-पे द्वारे स्वीकारण्यात आल्याचेही तक्रारीत नमूद होते.

तक्रारीची पडताळणी २० फेब्रुवारी रोजी जिंतूर रोडवरील जगदंबा हॉटेल येथे करण्यात आली. पडताळणीदरम्यान सुरुवातीला २५ हजार रुपयांची मागणी करून त्यापैकी ८ हजार रुपये स्वीकारल्याचे मान्य करण्यात आले. उर्वरित रकमेबाबत तडजोड करून १२ हजार रुपयांची मागणी करण्यात आली असून ती रक्कम वरिष्ठ पलटण नायक लटपटे यांच्याकडे देण्यास सांगण्यात आल्याचे निष्पन्न झाले.

यानंतर २३ फेब्रुवारी रोजी जिंतूर रोडवरील हॉटेल रायबा येथे सापळा रचण्यात आला. शासकीय पंचासमक्ष वरिष्ठ पलटण नायक ज्ञानोबा लटपटे यांनी तक्रारदाराकडून १२ हजार रुपयांची लाच स्वीकारताच पथकाने त्यांना रंगेहात पकडले. या कारवाईत तिन्ही आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे.

अंगझडतीदरम्यान नानासाहेब मोखडे यांच्याकडून विवो कंपनीचा मोबाईल व २०० रुपये रोख रक्कम, माणिक वाडेकर यांच्याकडून रेडमी कंपनीचा मोबाईल व ४ हजार ५५५ रुपये रोख रक्कम, तर ज्ञानोबा लटपटे यांच्याकडून विवो कंपनीचा मोबाईल व १०० रुपये रोख रक्कम जप्त करण्यात आली.

## विज्ञान आठवडा उत्साहात विविध स्पर्धांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**सेलू,/प्रतिनिधी :-** क्युरिऑसिटी सायन्स अँड इनोव्हेशन ॲक्टिव्हिटी सेंटर, सेलू (जि. परभणी) यांच्या वतीने राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून त्याअंतर्गत प्रिन्स इंग्लिश स्कूल व ज्यु. कॉलेज, सेलू येथे विज्ञान आठवडा उत्साहात साजरा केला जात आहे.



आज दि. २४ फेब्रुवारी रोजी विज्ञान आठवड्यांतर्गत विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. इयत्ता १ ली ते ५ वी विद्यार्थ्यांसाठी विज्ञान आधारित चित्रकला व रंगभरण स्पर्धा घेण्यात आली. ''माझा आवडता वैज्ञानिक'', ''दैनंदिन जीवनातील विज्ञान'' आणि ''पृथ्वीचे रक्षण'' या विषयांवर विद्यार्थ्यांनी कल्पक व आकर्षक चित्रे साकारत विज्ञानाविषयीची आपली समज रंगांच्या माध्यमातून व्यक्त केली. तसेच इयत्ता ६ वी ते ९ वी विद्यार्थ्यांसाठी वादविवाद व भाषण स्पर्धा आयोजित करण्यात आली. ''नासा व इस्रो'', ''कृत्रिम बुद्धिमत्ता'' आणि ''हवामान बदल'' या समकालीन विषयांवर विद्यार्थ्यांनी अभ्यासपूर्ण मते मांडली. त्यांच्या सादरीकरणातून वैज्ञानिक दृष्टिकोन, तर्कशक्ती आणि आधुनिक विज्ञानाबाबतची जागरूकता स्पष्टपणे दिसून आली.

राष्ट्रीय विज्ञान दिन २८ फेब्रुवारीपर्यंत दररोज विज्ञानावर आधारित विविध उपक्रम राबवले जाणार असून स्पर्धांतील विजेत्या विद्यार्थ्यांचा मुख्य कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मान करण्यात येणार आहे.

हा विज्ञान आठवडा डॉ. संजय रोडगे, अध्यक्ष श्रीराम प्रतिष्ठान, सेलू संचलित एल. के. आर. रोडगे प्रिन्स इंग्लिश स्कूल, सेलू यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आला असून प्रिन्सिपल कार्तिक रत्नाला यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम यशस्वीपणे पार पडत आहे.

### सेलू येथे संगीतसूर्य केशवराव भोसले संगीत महोत्सवाचे आयोजन

**सेलू,/प्रतिनिधी-** सेलू येथे संगीतसूर्य केशवराव भोसले संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

संगीतसूर्य केशवराव भोसले यांच्या जयंतीनिमित्त सेलू येथे भव्य संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे.

संगीतसूर्य केशवराव भोसले सांस्कृतिक परिषद जिल्हा शाखा परभणी व जनजागरण संगीत विद्यालय सेलू यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या संगीत महोत्सवाच्या नियोजनाची बैठक दि. २२ फेब्रुवारी २०२६ रोजी उत्साहात पार पडली.

दि. ९ ऑगस्ट रोजी संगीतसूर्य केशवराव भोसले यांची जयंती असून, त्या औचित्याने सेलू नगरीत दर्जेदार शास्त्रीय संगीत महोत्सव साजरा करण्यात येणार आहे. शास्त्रीय संगीताचा प्रचार व प्रसार व्हावा, त्याचबरोबर नवोदित कलाकारांना व्यासपीठ मिळावे आणि रसिकांना दर्जेदार मैफिलींचा आस्वाद घेता यावा, या उद्देशाने दर महिन्याला शास्त्रीय संगीताची मैफिल आयोजित केली जाणार आहे. या मालिकेतील पुढील मैफिल दि. २८ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता जनजागरण संगीत विद्यालय, सेलू येथे संपन्न होणार आहे. सर्व संगीतप्रेमी व रसिक श्रोत्यांनी या मैफिलीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

बैठकीस यशवंतराव चारठाणकर, गंगाधर कान्हेकर, डॉ. विलास मोरे, रामराव बोबडे, रामराव गायकवाड, सर्जेराव लहाने, मुख्याध्यापक येडके सर, जोशी सर, सच्चिदानंद डाखोरे, ॲड. भुक्तर व डॉ. भास्कर शिंदे यांची उपस्थिती होती.

## जिल्हास्तरीय अधिकारी व कर्मचारी यांच्या क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेमध्ये जिंतूर पंचायत समिती अव्वल....

**जिंतूर,/प्रतिनिधी:** जिल्हा परिषद व्यवस्थापन अंतर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांचे शारीरिक, मानसिक, भावनिक आरोग्य चांगले राहावे या दृष्टिकोनातून जिल्हा परिषद परभणी च्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतिषा माथुर यांच्या संकल्पनेतून आणि उप मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप घोन्सीकर यांच्या नियोजन मधून क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या सर्व स्पर्धा बीटस्तर, तालुकास्तर व जिल्हा स्तरावर संपन्न झाल्या.

जिंतूर पंचायत समिती चे गटविकास अधिकारी सुभाष मानकर यांनी अतिशय नियोजनबद्ध बीटस्तर व तालुकास्तर स्पर्धा घेऊन क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेमध्ये नैपुण्य प्राप्त असणाऱ्या स्पर्धकांची व कलाकारांची निवड केली. क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा यांचा सराव करण्यासाठी व्यवस्थित नियोजन करून सर्व स्पर्धक व सांस्कृतिक स्पर्धेत सहभागी होणाऱ्या कलाकारांना पुरेसा वेळ उपलब्ध करून दिला. प्रत्यक्ष होणाऱ्या सरावाचे निरीक्षण केले. क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेच्या सरावामध्ये क्रीडा प्रकारात व सांस्कृतिक प्रकारात नैपुण्य व कौशल्य दाखविणाऱ्यावर बारकाईने लक्ष ठेवून अंतिम जिल्हा स्तरावर क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेसाठी जिंतूर पंचायत समिती अंतर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांची योग्य निवड केली. या कार्यामध्ये गटशिक्षणाधिकारी त्र्यंबक पोले यांनी शिक्षण विभागा अंतर्गत कार्यरत स्पर्धक व कलाकार यांच्या समन्वयासाठी विशेष प्रयत्न केले. दिनांक १७ व १८ फेब्रुवारी २०२६ रोजी परभणी येथे संपन्न झालेल्या जिल्हास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेमध्ये जिंतूर पंचायत समितीने सर्वच क्रीडा प्रकारात व सांस्कृतिक प्रकारात आपला उल्लेखनीय सहभाग नोंदवला. एवढेच नव्हे तर वैयक्तिक क्रीडा प्रकारात व सामुहिक क्रीडा प्रकारात जिंतूर तालुक्याने भरीव यश संपादन केले. यामध्ये रस्सीखेच, बॅडमिंटन, खो-खो, कबड्डी, क्रिकेट, धावणे, गोळा फेक, चालणे या विविध क्रीडा प्रकारात प्रथम क्रमांक मिळवला. तर सांस्कृतिक स्पर्धेतही जिंतूरने आपली उल्लेखनीय कामगिरी नोंदवत गीत गायन वैयक्तिक नृत्य, समूह नृत्य, हास्यजत्रा यामध्ये वेगवेगळे क्रमांक मिळवले स्वतः गटविकास अधिकारी सुभाष मानकर यांनी उत्कृष्ट गीत गायन करत प्रथम क्रमांक मिळवला. एकंदरीत जिंतूर तालुक्याच्या या क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातील भरीव कामगिरीबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी नतीशा माथूर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रश्मी खांडेकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी संदीप घोन्सीकर यांनी जिंतूर तालुक्याचे विशेष कौतुक केले. जिल्हाभरामध्ये गटविकास अधिकारी सुभाष मानकर यांच्याकडे असणारी कल्पकता गुणग्राहकता आणि शिस्तबद्ध नियोजनाचे कौतुक होत आहे. सर्व स्पर्धेत शिक्षकांचा उत्स्फूर्त सहभाग यासाठी तीन वर्षापासून सुरू असणाऱ्या शिक्षकांच्या विविध स्पर्धेबद्दल गटशिक्षणाधिकारी त्र्यंबक पोले यांच्याही कार्याचा गौरव केला

## अग्रलेख...

# जगण्याचे मरणमार्ग

गरज आणि हव्यास ही मानवी स्वभावाची दोन टोके जेव्हा एकमेकांशी तीव्र संघर्ष करू लागतात तेव्हा संस्कार, संस्कृती, माणुसकी, परंपरा आदी शब्द लाजेने तोंड लपवितात. 'हे जीवन सुंदर आहे' वगैरे विचार म्हणजे भरल्या पोटीच्या केवळ कविकल्पना वाटू लागतात. गरजेपोटी नाडलेल्यांचे जगणे आणि हव्यासापोटी गरजवंतांना नागविणाऱ्यांचे जगणे यांमधील संघर्ष हाच जगाचा खरा व्यवहारवाद वाटू लागतो. खरे पाहता, माणुसकी हा माणसाचा जन्मजात स्वभावधर्म मानला जातो. तो काही मनावर घडविण्याचा संस्कार नव्हे. माणुसकी ही माणसाची मक्तेदारी मानली जाते. अन्य प्राण्यांतही विवेकबुद्धी असते. त्यानुसार ते जेव्हा वागतात, तेव्हा त्यांच्यातील माणुसकीचे दर्शन घडल्यास ते आश्चर्य मानले जाते. माणसाने माणुसकीने वागणे हा माणसाचा स्वभावधर्म मानला जात असल्याने त्याच्या विपरीत वागणाऱ्या माणसाचे वागणे मात्र 'पाशवी' म्हटले जाते. पण व्यवहारवाद वाढत चालला आणि माणसाच्या अंगीचे माणुसकीचे मूळ गुण दुर्मिळ होत चालले. तसे काही दर्शन माणसाच्या अंगी एखाद्या प्रसंगी घडलेच, तर ते आश्चर्य मानले जाऊ लागले आणि माणुसकीच्या वागण्याच्या बातम्या होऊ लागल्या. साधारणतः जेव्हा एखादी नैसर्गिक गोष्ट सहजपणे घडून जाते तेव्हा ती बातमी नसते. विशिष्ट हंगामात झाडांना येणारा मोहोर, फुलांनी बहरणाऱ्या वेली, कोकिळेचे कूजन या बाबी नैसर्गिक असल्याने झाडे मोहरली, वेली बहरल्या किंवा कोकिळांच्या सुरांनी रानावनांवर संगीताचा साज चढला तर त्यामुळे मनाला आनंद होत असला, तरी तसे घडणे अपेक्षितच असल्याने त्याचे काही वेगळेपण वाटत नाही. उलट, त्या त्या हंगामात तसे घडले नाही तर मात्र त्याचे आश्चर्य वाटून त्याची बातमी होते. माणुसकी हा नैसर्गिक स्वभाव मानला जात असल्याने माणुसकीशून्य व्यवहारांचे आश्चर्य व्यक्त व्हायला हवे. प्रत्यक्षात व्यवहारवाद, चंगळवाद आणि आटत चाललेली माणुसकी यांमुळे माणसाच्या मनामध्ये होणारे बदल एवढे सहज वाटू लागले आहेत की, त्यातून घडणाऱ्या माणुसकीशून्य व्यवहारांचाच सर्वत्र सुळसुळाट सुरू झाल्याने माणुसकी आश्चर्याची बाब ठरू लागली असून पाशवी व्यवहारांच्या बातम्यांनी माणुसकीचे अस्तित्व संकटात आणले आहे.

जन्माला आल्यानंतर नैसर्गिकपणे मृत्यू येईपर्यंत जगणे हा माणसाचाच नव्हे, तर कोणत्याही सजीवाचा जन्मसिद्ध हक्क मानला जातो. नैसर्गिकपणे जगण्याच्या या हक्काची जपणूक व्हायला हवी, असे तीव्रतेने वाटण्याजोगे काही अस्वस्थ प्रकार अलिकडे बेसुमारपणे वाढत आहेत. महाराष्ट्रात स्त्री बीजांड विक्री नावाचे एक भयंकर प्रकरण समोर येत आहे. हा विषय नैतिक, कायदेशीर आणि सामाजिकदृष्ट्या संवेदनशील असल्याने त्याची गांभीर्याने चर्चा व्हावयास हवी. हे प्रकरण थेट माणुसकीलाच आव्हान देणारे ठरले आहे. विज्ञानाच्या प्रगतीने वंध्यत्वावर मात करण्यासाठीचे मार्ग शोधले असले, तरी त्याचा व्यापार सुरू होतो तेव्हा विज्ञान हा माणुसकीला काळिमा लावणारा प्रकार ठरू शकतो. विज्ञानाचे रूपांतर जेव्हा व्यवहारवादी व्यवसायात होते, तेव्हा अनेक प्रश्न उभे राहतात. महाराष्ट्रातील काही महानगरांत आणि त्यांच्या आसपास फोफावणाऱ्या शहरांत एका व्यावसायिक तंत्रज्ञानाची मोठी उलाढाल होत असते. 'एआरटी' म्हणजे, 'असिस्टेड रीप्रॉडक्टिव टेक्नॉलॉजी' असे या तंत्रज्ञानाचे नाव आहे. या तंत्रज्ञानाचा वापर करून वंध्यत्वावर मात करता येते आणि पालकत्वाच्या आस लागलेल्यांना अपत्यप्राप्तीचा मार्गदेखील या तंत्रज्ञानातून सुलभतेने मिळवून दिला जातो. कदाचित यामुळेच आर्थिक शोषणाचा नवा धंदा सुरू झाला असून अनेकदा जगण्याच्या संघर्षात मेटाकुटास आलेल्या व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील महिलांना पैशांचे आमिष दाखवून बीजांडदानासाठी प्रवृत्त केले जाते, असे उघडकीस आले आहे. या क्षेत्रातील दलालांची साखळी अशा गरजवंत महिलांच्या शोधात सक्रिय असते. ते अशा महिलांचा शोध घेतात आणि त्यांना पैशांचे आमिष दाखवून बीजांड विक्रीस प्रवृत्त करतात, असा हा धंदा सध्या फोफावला असून त्याची पाळेमुळे वेगवेगळ्या ठिकाणी खोलवर रुजलेली असावीत, अशी शंका व्यक्त होत आहे. ठाणे जिल्ह्यातील बदलापूर नावाचे शहर गेल्या काही वर्षांत अनेक प्रकरणांमुळे वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. या शहरातच गेल्या काही दिवसांत या धंद्याचे बीभत्स रूप समोर येत असून बीजांड विक्रीच्या व्यवसायात गरजू महिलांना गुंतविले जात असल्याचे काही प्रकार उघडकीस आले आहेत. धंदेवाईक आणि दलालांचे एक व्यापक जाळे या धंद्यात मुरले असल्याचे काही महिलांवर झालेल्या कारवाईतून समोर येत आहे आणि सुमारे २० महिला या जाळ्यात गुरफटून बीजांड विक्रीसाठीच्या आमिषाला बळी पडल्याचा संशय व्यक्त होत आहे. केवळ २०-२५ हजारांच्या मोबदल्यात स्त्री बीजांडे खरेदी करून अपत्यहिनांकरिता मुलांचे उत्पादन करून देणारे कारखाने म्हणून अशा पीडित महिलांचे आयुष्य वेठीस धरले जात असल्याची विषण्ण जाणीव करून देणाऱ्या या प्रकारामुळे माणुसकीच्या कल्पनेस मोठा धक्का बसला आहे. भारतीय समाजात स्त्रीदेह आणि मातृत्व या संकल्पना अत्यंत पवित्र मानल्या जातात. बीजांड विक्रीच्या या अनैतिक धंद्यामुळे या संकल्पनांच्या पावित्र्यालाच मोठा धक्का पोहोचला असून संस्कार, संस्कृती, परंपरांना खुंटीवर टांगणाऱ्या धंदेवाईकपणापुढे माणुसकीने मान टाकली आहे. बीजांडाची विक्री हा जीवनाच्या मूलभूत अंशाचा व्यापार असल्याने नैतिकदृष्ट्या हा धंदा गुन्हेगारी स्वरूपाचाच ठरतो. त्यामुळे अशा गैरप्रकारास आळा घालण्याकरिता कठोर उपाययोजना आणि गुन्हेगारांवर कठोर कारवाई ही आजच्या महाराष्ट्राची सर्वात प्राधान्याची गरज ठरली पाहिजे. कारण बीजांड विकणारी स्त्री आणि अपत्यास जन्म देणारी माता यांच्यातील संघर्षात आता परंपरा जपली जाणार की व्यावसायिकता प्रभावी ठरणार, हा मुद्दा ऐरणीवर आला आहे. सुमारे चार वर्षांपूर्वी २०२२ मध्ये तामिळनाडूतील इरोडमध्ये एका जन्मदात्रीने आपल्या १६ वर्षांच्या मुलीच्या वयाचे बनावट दाखले तयार करून आठ वेळा तिच्या बीजांडाची विक्री केल्याचे धक्कादायक प्रकरण उघडकीस आल्यानंतर देश हादरला होता. या प्रकरणानंतर तामिळनाडूतील चार इस्पितळांना टाळे ठोकण्यात आले आणि गुन्हेगारांवर कायदेशीर कारवाई झाली. त्यानंतर आता महाराष्ट्रात हाच प्रकार उघडकीस येत असल्याने अशा धंद्याचे एखादे आंतरराज्य किंवा आंतरराष्ट्रीय जाळे आहे का, ते कोठपर्यंत पसरलेले आहे, याचा तातडीने तपास व्हायला हवा. कारण मानवी देहाचा व्यापार मांडणारा हा प्रकार एखाद्या संघटित गुन्हेगारीचा आणि आंतरराष्ट्रीय टोळ्यांच्या कॉर्पोरेट गुन्हेगारी सिंडिकेटसारखा असल्याचा संशय व्यक्त होत आहे. सोयीच्या जागा हेरून हा धंदा केला जात असून विदेशी ग्राहकांसाठी भारतीय बीजांडांची बाजारपेठ असे याचे स्वरूप नाही ना, याचाही तपास व्हावयास हवा. अलिकडे समाजमाध्यमे, डार्क वेब नावाचे आभासी तंत्रज्ञान विकसित झाल्यापासून अशा धंद्याचे जाळे पसरविणे सहज शक्य होत असल्याने या माध्यमांवरही लक्ष ठेवावयास हवे. केवळ बीजांड विक्रीच नव्हे, तर गरजवंतांच्या मूत्रपिंडांचा व्यापारदेखील चिंताजनक स्वरूप धारण करीत असल्याचे घडकीस येत आहे. गरजवंत, कर्जबाजारी शेतकरी आर्थिक आव्हानांपुढे गुडघे टेकून आपल्या गरजा भागविण्यासाठी किडनी विक्री करीत असल्याच्या बातम्या समाजाच्या परंपरा, संस्कृती, माणुसकी आदी संस्कारांना वाकुल्या दाखवत आहेत. ऊस तोडणी कामगार महिलांवर रोजगार बुडू नये म्हणून गर्भाशये काढून टाकण्याची वेळ येते, गरजवंत महिलांवर पैशांसाठी बीजांडे विकण्याची वेळ येते, गरजू, कर्जबाजारी शेतकऱ्यांना आर्थिक संकटातून मार्ग काढण्यासाठी किडनी विकावी लागते, तेव्हा हे प्रकार केवळ आर्थिक गरजांवरील उत्तरे शोधणारे राहात नाहीत तर संस्कृती, परंपरा आणि माणुसकीच्या मूल्यांना आव्हाने देणारे ठरतात. मूल्ये, परंपरा आणि संस्कृतीचा ऱ्हास होत असतानाच्या काळाची संधी साधून धंदेवाईकपणापुढे मानवतेलाच नमविणाऱ्या या प्रकारांची पाळेमुळे कायमची खणून काढावयास हवीत. अन्यथा माणसाच्या मूलभूत स्वभाव धर्माचे अस्तित्वच संपुष्टात येईल.

## आंतरराष्ट्रीय

प्रा. जयसिंग यादव

# झाकोळला गेलेला महत्त्वाचा दौरा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या आठवड्यात केलेला मलेशिया दौरा हा जगातील आणि भारतातील महत्त्वाच्या घडामोडींमुळे काहीसा दुर्लक्षित राहिला असला, तरी त्याची दखल घेणे आवश्यक आहे. मलेशिया हे दक्षिण आशियातील छोटे राष्ट्र असले, तरी मोदी यांनी त्यांच्या गेल्या एका तपातील पंतप्रधानपदाच्या काळात मलेशियाला तिसऱ्यांदा भेट दिली. यावरून या देशाचे भू-राजकीय महत्त्व लक्षात यायला हरकत नाही. मोदी यांच्या भेटीमुळे केवळ प्राचीन संस्कृती आणि सांस्कृतिक संबंधच पुनरुज्जीवित झाले नाहीत, तर संरक्षण आणि डिजिटल पेमेंट क्षेत्रातही भारताचे महत्त्व स्थापित झाले. पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांनी केलेले मोदी यांचे भव्य स्वागत हे भारताच्या वाढत्या जागतिक सामर्थ्याचे प्रतीक आहे. मोदी यांच्या दौऱ्यातील सर्वात मोठी बातमी म्हणजे भारताची डिजिटल पेमेंट प्रणाली आता मलेशियामध्येही कार्यरत होईल. भारताच्या 'नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया' (एनपीसीआय) ची आंतरराष्ट्रीय शाखा 'एनआयपीएल' आणि मलेशियाच्या 'पेनेट' यांच्यात एक ऐतिहासिक करार झाला आहे. मोदी यांनी स्वतः ही घोषणा केली. आता भारतीय पर्यटक आणि व्यावसायिक मलेशियामध्ये डिजिटल व्यवहार सहज करू शकतील. हे भारताच्या 'फिनटेक' कौशल्याचे प्रमाणपत्र आहे.

मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांनी राजशिष्टाचार मोडून मोदी यांचे स्वतः विमानतळावर जाऊन स्वागत केले. दोन नेत्यांमधील ही 'केमिस्ट्री' जगाने पाहिली. दोन्ही नेत्यांनी 'सलामत दातांग' (स्वागत आहे, मोदीजी) कार्यक्रमात भाग घेतला. यावेळी १२ हजारांहून अधिक मलेशियन आणि अनिवासी भारतीयांच्या गर्दीने 'मोदी, मोदी!' असा जयघोष केला. सांस्कृतिक आघाडीवरही इतिहास रचला गेला. ८०० मलेशियन नर्तकांनी एकाच व्यासपीठावर भारतीय शास्त्रीय आणि लोकनृत्य सादर केले. या उल्लेखनीय कामगिरीची नोंद 'मलेशियन बुक ऑफ रेकॉर्ड'मध्ये झाली. भारतीय संस्कृती तिथे किती खोलवर रुजली आहे, हे यावरून दिसून येते. ऑगस्ट २०२४ मध्ये दोन्ही देशांनी त्यांचे संबंध व्यापक धोरणात्मक भागीदारीत वाढविल्यानंतर मोदी यांचा आग्नेय आशियाई देशाचा हा पहिलाच दौरा होता. यापूर्वी नोव्हेंबर २०१५ आणि २०१८ मध्ये त्यांनी मलेशियाला भेट दिली होती. मलेशिया हा सेमीकंडक्टरच्या सर्वात मोठ्या निर्यातदारांपैकी एक आहे. तो जागतिक स्तरावर सहाव्या क्रमांकावर आहे. मलेशियाच्या सरकारी आकडेवारीनुसार, हे क्षेत्र जीडीपीमध्ये सुमारे २५ टक्के योगदान देते. भारत सेमीकंडक्टरच्या बाबतीत चीन, तैवानवर अवलंबून आहे. भारत सेमीकंडक्टर उत्पादनाला प्रोत्साहन देत असला, तरी ते स्थिर व्हायला वेळ लागणार आहे. अशा वेळी मलेशियाशी झालेला करार अतिशय महत्त्वाचा आहे.



मलेशियाला या क्षेत्रामध्ये सुमारे ३० ते ४० वर्षांचा अनुभव आहे. दोन्ही देशांनी अक्षय ऊर्जा, सेमीकंडक्टर, आपत्ती व्यवस्थापन आणि शांतता प्रयत्नांसह ११ करारांवर स्वाक्षरी केली. मोदी यांनी मलेशियामध्ये नवीन भारतीय वाणिज्य दूतावास स्थापन करण्याची घोषणा केली. क्वालालम्पूरमधील मलाया विद्यापीठात एक समर्पित तिरुवल्लूवर केंद्र जाहीर करण्यात आले. मलेशियामध्ये भारतीय वंशाचे सुमारे २७ लाख ५० हजार लोक राहतात. मलेशियाच्या एकूण लोकसंख्येत हे प्रमाण नऊ टक्के आहे. त्यापैकी अंदाजे २० लाख लोक तमिळ भाषा बोलतात. मलेशिया आणि भारतामध्ये १९५७ पासून राजनैतिक संबंध आणि परस्पर भागीदारी आहे. ऑगस्ट २०२४ मध्ये ही भागीदारी व्यापक धोरणात्मक भागीदारी (सीएसपी) मध्ये परावर्तित करण्यात आली. मोदी यांच्या भेटीदरम्यान दोन्ही बाजूंनी व्यापार, संरक्षण, ऊर्जा आणि डिजिटल तंत्रज्ञानातील संबंध मजबूत करण्यावर लक्ष केंद्रित केले आणि वादग्रस्त मुद्द्यांवर सार्वजनिकरीत्या चर्चा न करण्याची काळजी घेतली. त्यामुळेच संयुक्त निवेदनात झाकीर नाईकच्या प्रत्यार्पणाबद्दल काहीही उल्लेख नाही. भारत आणि मलेशियाने दहशतवादविरोधी सहकार्य, गुप्तचर माहिती सामायिकरण आणि संयुक्त राष्ट्र संघ आणि वित्तीय कृती कार्य दलाशी या मुद्द्यावर समन्वय या मुद्द्यांवर चर्चा केली.

मोदी यांनी २०१४ मध्ये सत्ता स्वीकारल्यानंतर 'पूर्वेकडे पहा' धोरण सुरू केले. त्याचे चांगले परिणाम दिसून येत आहेत. भारत-मलेशियाच्या संयुक्त निवेदनात म्हटले आहे की, भारत आणि मलेशिया सीमापार दहशतवादाचा स्पष्टपणे निषेध करतात. त्यात सीमापार दहशतवादाचा समावेश आहे. हा पाकिस्तानला दिलेला झटका आहे. मलेशिया आणि भारताने २०१५, २०१७ आणि २०२४ मध्ये दहशतवादावर संयुक्त निवेदने जारी केली होती; परंतु पहिल्यांदाच सीमापार दहशतवादाचा उल्लेख करण्यात आला. हे भारताचे यश आहे. कारण भारतात दहशतवादी कृत्ये घडवण्यास पाकिस्तानमधून प्रोत्साहन दिले जाते. हे संयुक्त निवेदन पाकिस्तानसाठी चिंतेचे कारण असू शकते. मोदी यांची भेट आणि झालेले करार दोन्ही देशांमधील संबंधांमध्ये विश्वास निर्माण करेल. महाथिर मोहम्मद यांच्या काळात भारत आणि मलेशियाचे संबंध बिघडले होते. आता ते सुधारत आहेत. महाथिर यांनी संयुक्त राष्ट्रांमध्ये काश्मीरचा मुद्दा उपस्थित केला होता. मलेशिया आणि भारत आसियान गटाचा भाग आहेत. 'आसियान फोरम'मध्ये भारताला मिळत असलेला पाठिंबा पाकिस्तानसाठी चिंतेचे कारण असू शकते. भारताने 'आसियान फोरम'मध्ये दहशतवादाचा अजेंडा आणल्याने पाकिस्तानला काळजी वाटणे स्वाभाविक आहे. कारण मलेशिया आणि भारत २०२७ पर्यंत आसियान दहशतवादावरील उपसमितीचे सह-अध्यक्ष आहेत. संयुक्त निवेदनात सीमापार दहशतवादाचा उल्लेख केल्याने पाकिस्तानच्या चालू कारवाया आसियान आणि इतर मंचांवर आणणे सोपे होईल.

भारत-मलेशिया संबंधांचा परिणाम पाकिस्तानवरही होऊ शकतो. मोदी यांचा दौरा पाकिस्तानचे नौदल प्रमुख ॲडमिरल नवीद अशरफ यांच्या भेटीच्या वेळीच झाला. त्यांनी 'रॉयल मलेशियन' नौदल प्रमुख झुल्हेल्मी बिन इंथानियन यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान प्रादेशिक सागरी सुरक्षा, संयुक्त सराव, माहितीची देवाणघेवाण, चाचेगिरी आणि दहशतवाद यासारख्या धोक्यांशी लढण्यावर चर्चा झाली. तथापि, अधिकृत निवेदनांमध्ये व्यावसायिक नौदल संबंध मजबूत करणे आणि परस्पर फायद्यासाठी सागरी सहकार्य वाढविणे यावर भर देण्यात आला. मलेशिया आणि पाकिस्तानमध्ये १९५७ पासून जवळचे राजनैतिक आणि संरक्षण संबंध आहेत. भूतकाळाच्या पलीकडे जाऊन मलेशिया आता भारताकडे पाहात आहे. याचे एक कारण म्हणजे चीन आणि अमेरिका यांच्यातील वाढता तणाव. पाकिस्तानशी दीर्घकालीन संबंध असले, तरी मलेशिया भारताशीही संबंध मजबूत करू इच्छित आहे. भारत आणि मलेशियामधील चर्चा संरक्षण आणि दहशतवादावर केंद्रित असताना व्यापार आणि उत्पादनाशी संबंधित क्षेत्रांवर चर्चा झाली. भारत मलेशियातून पाम तेल आणि इलेक्ट्रॉनिक्स उत्पादने आयात करतो. ॲल्युमिनियम आणि पेट्रोलियम उत्पादने निर्यात करतो. मलेशिया आणि भारताने सेमीकंडक्टरबाबत करार केला आहे. त्यात तांत्रिक सहकार्य समाविष्ट आहे. भारत या वर्षाच्या अखेरीस ब्रिक्स शिखर परिषदेचे अध्यक्षपद भूषवेल. संयुक्त निवेदनात भारताने मलेशियाच्या सदस्य होण्याच्या आकांक्षांचा फक्त उल्लेख केला. याचा अर्थ मलेशिया आता 'ब्रिक्स' परिषदेचा सदस्य होऊ शकतो. पाकिस्तान सध्या 'ब्रिक्स' परिषदेचा सदस्य नाही. तथापि, पाकिस्तानने २०२३ मध्ये या गटात सामील होण्यासाठी अधिकृत अर्ज केला आहे; भारताच्या मान्यतेशिवाय पाकिस्तानला सदस्यत्व मिळणे अवघड आहे. मलेशियासाठी दरवाजे उघडले जात आहे, ही एक व्यूहात्मक चाल आहे.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

नितीन शिरसाट

# कचरा संकलनात नागरिकांचा सहभाग

भारत सरकारने सुरू केलेल्या स्वच्छ भारत अभियान या व्यापक उपक्रमाने देशात स्वच्छतेबाबत नवे भान निर्माण केले. २ ऑटोबर २०१४ रोजी महात्मा गांधींच्या प्रेरणेने सुरू झालेला हा उपक्रम केवळ स्वच्छता नव्हे तर सामाजिक परिवर्तनाचा संदेश देतो. या अभियानाद्वारे लाखो स्वच्छतागृहे उभारण्यात आली, कचरा व्यवस्थापनाला चालना मिळाली आणि जनतेत स्वच्छतेबाबत जाणिवा जागृत झाल्या. महिलांच्या सुरक्षिततेसाठी, मुलांच्या शिक्षणासाठी आणि पर्यावरणाच्या दृष्टीने हे एक सकारात्मक पाऊल ठरले. मात्र, अंमलबजावणीत अडथळे आहेत. घराघरात कचरा वेगळा केला जात नाही. रस्त्यावर कचरा टाकणे थांबत नाही. माहिती असूनही नागरिक कृती करताना दिसत नाहीत. यातून एक गोष्ट स्पष्ट होते की, सरकारच्या योजना यशस्वी होण्यासाठी नागरिकांचा सहभाग अत्यावश्यक असतो. त्यामुळे शहरातील घनकचरा व्यवस्थापन यशस्वी करायचे असेल तर स्वच्छ भारत अभियानमधून मिळालेल्या अनुभवांचा अभ्यास करून त्यात आलेले अडथळे दूर करण्यासाठी सर्व स्तरांवर सकारात्मकरीत्या पुढील पावले उचलली पाहिजेत.काळानुरूप बदल घडविण्यासाठी शासनाने २०२५ साली घनकचरा व्यवस्थापनासाठी नव्या मसुदा नियमांची घोषणा केली. बुलढाणा जिल्ह्यातील शहरांच्या सीमारेषा झपाट्याने विस्तारत असताना घनकचऱ्याच्या वैज्ञानिक विल्हेवाटीचा प्रश्न अधिकच गंभीर बनत आहे. १० फेब्रुवारी रोजी झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत शहरी भागालगतच्या निमशहरी पट्ट्यातील कचरा व्यवस्थापनाचा मुद्दा केंद्रस्थानी आला. या विषयाकडे लक्ष वेधत संबंधित सदस्यांनी जिल्हास्तरीय समन्वित व दीर्घकालीन आराखडा तयार करण्याची गरज व्यक्त केली. शिंदेसेनेचे आ. संजय गायकवाड यांनी प्रकर्षाने या मुद्द्याला या बैठकीत हात घातला होता. जिल्ह्यातील नागरिक भागातील लोकसंख्या सध्या साडेसहा लाखांच्या घरात पोहोचली आहे. शहरांभोवती निमशहरी पट्टा वेगाने विकसित होत आहे; मात्र या भागात कचरा संकलन, वर्गीकरण व प्रक्रिया करण्यासाठी पुरेशा पायाभूत सुविधा उपलब्ध नाहीत. नीती आयोग तसेच केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने लहान व मध्यम शहरांसाठी विकेंद्रित कचरा प्रक्रिया प्रणाली, जैव विघटन प्रकल्प आणि कंपोस्ट निर्मिती केंद्रांची शिफारस केली आहे. सुरक्षित कचरा भराव जागा (सॅनिटरी लँडफिल) उभारणे आणि स्रोतस्थानी कचरा वर्गीकरण सक्तीचे करणे हे आवश्यक उपाय मानले जातात. सध्या निमशहरी पट्टा हा शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिकार क्षेत्राबाहेर आणि ग्रामीण प्रशासनाच्या मर्यादित संसाधनांमध्ये अडकलेला आहे. पर्यावरणीय व सार्वजनिक आरोग्याच्या समस्या निर्माण होत आहेत. मुंबईत दररोज सुमारे सात हजार ते आठ हजार टन कचरा निर्माण होतो. पुणे, नाशिक, ठाणे, छत्रपती संभाजी नगर किंवा नागपूर यांसारख्या शहरांमध्ये ही संख्या लक्षणीय आहे. शहरांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्था कचरा संकलन, वाहतूक आणि विल्हेवाट लावण्याचे काम करीत असल्या तरी अपुरी साधने, अपुरे मनुष्यबळ, नियोजनाचा अभाव यांमुळे ही व्यवस्था कोलमडते. प्रत्येकाच्या घरात इलेट्रॉनिक वस्तूंचा वापर प्रचंड वाढला आहे. परंतु या वस्तू खराब झाल्यावर त्यांचे काय करायचे, हा प्रश्न उत्पन्न होतो. याच समस्येवर मात करण्यासाठी पूर्णम इकोव्हिजन, पर्यावरण संरक्षण गतिविधी आणि परसिस्टंट फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'पहल २०२६' या भव्य ई-कचरा संकलन आणि जनजागृती अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. घरात वापरले जाणारे खराब मोबाईल, चार्जर, लॅपटॉप, टीव्ही, मिक्सर, जुन्या वायरी किंवा बॅटऱ्या यांसारख्या वस्तूंना फेकून देतात किंवा जाळतात. हा कचरा जाळल्यास त्यातून निघणारा धूर हवेत विषारी वायू सोडतो, ज्यामुळे श्वसनाचे विकार आणि कॅन्सरसारखे गंभीर आजार होऊ शकतात. हे अभियान केवळ साफसफाई नसून चक्रीय अर्थव्यवस्थेवर आधारित आहे. शहरातील सर्व शाळा, महाविद्यालये आणि कमर्शियल कॉम्प्लेक्स, दुकाने, कार्यालये, रहिवासी सोसायट्या आणि घराघरांतील संकलन संत गाडगेबाबा यांच्या स्वच्छतेच्या विचारांचा वारसा पुढे नेत या अभियानांतर्गत विशेष मोहीम राबविली जात आहे. नागरिकांनी ई-कचरा संकलनात स्वतः पुढाकार घेऊन पर्यावरणाच्या दृष्टीने सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे.



९८८१७१७८२८


## इतस्ततः

दत्तात्रेय आंबुलकर

# अमेरिकन करावर करारी मात

अमेरिका-भारत दरम्यान नव्याने झालेल्या करकपातीच्या करारावर उभय देशांपेक्षा त्यांचे प्रमुख म्हणून डोनाल्ड ट्रम्प व नरेंद्र मोदी यांचे व्यक्तिमत्त्व व कर्तृत्व म्हणून प्रकर्षाने पाहिले गेले. त्यामुळे या आर्थिक मसुद्याला मुत्सद्देगिरीचा आयाम जागतिक स्तरावर मिळत गेला. अमेरिकन सिनेट असो वा भारतीय संसद, या उभय सभागृहांपासून जगात लोकशाही मानणाऱ्या या दोन्ही देशांमध्ये कर-आकारणी, वाढीव अतिरिक्त कर व शेवटच्या टप्प्यात अतिरिक्त कर-आकारणी प्रकरणी ट्रम्प यांनी आपल्या पुढाकारासह घेतलेली माघार घेतली. या साऱ्या प्रकरणातील आर्थिक व्यवहारांपेक्षा ट्रम्प यांच्या मनमानीवर मोदींच्या मुत्सद्देगिरीने मात केल्याचे उभ्या जगाने पाहिले. यानिमित्ताने अर्थशास्त्र आणि आर्थिक व्यवहार-उलाढाल, युद्धजन्य व आव्हानात्मक परिस्थितीत जागतिक पातळीवरील धोरणात्मक निर्णयांची परिणामकारकता आदी विविध प्रमुख मुद्द्यांवर जगाने ट्रम्प-मोदी या उभयतांना पाहिले, परखले हे यासंदर्भात उल्लेखनीय ठरले.

व्यवस्थापकीय क्षेत्रात मोठ्या जबाबदारीसह काम करणाऱ्या व्यक्तीमध्ये वक्तृत्व, नेतृत्व व कर्तृत्व हे गुण विशेषत्वाने महत्त्वाचे ठरतात. यासंदर्भात तुलनात्मक स्वरूपात सांगायचे म्हणजे, आंतरराष्ट्रीय संबंधांसंदर्भात असणारे रूढ व प्रस्थापित रूढी आणि संकेत, अमेरिका-भारत परस्पर संबंधांना असणारी दीर्घकालीन पृष्ठभूमी, आंतरराष्ट्रीय स्तरावर संबंधांमधील मैत्रीची महत्ता व मान्यता इ. सर्व संकेत डोनाल्ड ट्रम्प यांनी पायदळी तर तुडविलेच; त्याला जोड दिली ती अप्रासंगिक, बेताल वक्तव्ये आणि मनमानीपणाची! याउलट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वेळेत-वेळेनुसार व समयानुकूल-संयमित भूमिका घेत परिस्थिती हाताळली, हा फरक प्रामुख्याने लक्षात येतो. बदलती आंतरराष्ट्रीय परिस्थिती, अल्पकालीन; पण परिणामकारक छेडलेल्या युद्धात पाकिस्तानला दिलेला चाप, आंतरराष्ट्रीय स्तरावर आर्थिक-अस्थिरता व अनिश्चितता असताना पण देशात निर्माण केलेले सबळ अर्थकारण आदी संदर्भात घेतलेली ठोस भूमिका व सर्वात महत्त्वाचे म्हणजे, भारत आणि भारतीयांच्या आर्थिक प्रगतीबरोबर भारतातील शेती आणि शेतकरी, कृषी उत्पादन, मत्स्योत्पादन इ. संदर्भात कुठलीही तडजोड न करता, देशहिताला सर्वोपरी ठेवून घेतलेले निर्णय, याचीच परिणती ट्रम्प यांनी आपली मनमानी बोली, शैली व देहबोली सर्व बाजूला ठेवून पश्चातबुद्धीने का होईना; पण भारतावरील अतिरिक्त, अवास्तव आणि अवाजवी कर सपशेल मागे घेण्याचा निर्णय आणि करार करण्यात पुढाकार घेतला.




व्यवस्थापन आणि व्यवस्थापकांमध्ये विशेषतः उच्च व जबाबदारीच्या पदांवर काम करणाऱ्यांमध्ये वैचारिक ठामपणा, विलक्षण आकलनशक्ती, भावनांवर नियंत्रण ठेवणारी बुद्धिमत्ता, आव्हानात्मक परिस्थितीवर मात करण्यासाठी आवश्यक असणारी समतोलता, संपूर्ण आकलनासह निर्णयक्षमता, प्रसंगी विरोधाचा सामना करून आपले म्हणणे मांडून अपेक्षित यश गाठण्याची मानसिकता व प्रवृत्ती व या साऱ्यांचा परिस्थितीनुरूप ताळमेळ घालण्याचे कौशल्य आवश्यक ठरते.

व्यवस्थापन पद्धती आणि शैलीमध्ये कुठल्याही मोठ्या व महत्त्वाच्या व्यापार-व्यवसायविषयक करार-मदारात चर्चा, वाटाघाटी हे मुद्दे अपरिहार्यपणे महत्त्वाचे ठरतात. विशेषतः अशाप्रकारचे करार आंतरराष्ट्रीय पातळीवरील असल्यास त्याकडे अधिक गांभीर्याने पाहिले जाते. अशा करारांमध्ये विविध व विभिन्न देशांचे व्यापारी व सामरिक हित सामावले असते, हे यामागचे महत्त्वाचे कारण ठरते. अशा व्यापारी कराराच्या प्रक्रियेत उच्च पातळीवर व नेतृत्वासह चर्चा करणार्या व्यक्तींकडे संवाद कौशल्यांच्या जोडीलाच उच्चस्तरावरील सातत्यपूर्ण एकाग्रता, लवचीकता, विवेकशीलता, सामंजस्य व त्याच वेळी ठामपणाची जोड, आपला मुद्दा मांडतानाच प्रसंगी पुढच्याची अडचण समजून घेणे, विविध पैलूंचा गांभीर्याने व साधक-बाधक पद्धतीने विचार करतानाच आपले 'स्व' आणि स्वहिताला बाधा पोहोचू नये अशी खबरदारी घेणे या बाबी महत्त्वाच्या ठरतात. वरील महत्त्वाच्या पृष्ठभूमीवर ट्रम्प-मोदी यांच्या दरम्यान झालेल्या चर्चा-बैठकी, संवाद-प्रतिवाद इ.चा ढोबळमानाने विचार केल्यास काय दिसते?

ट्रम्प यांनी अगदी सुरुवातीपासूनच भारताकडून होणाऱ्या निर्यातीवर अचानक व आकस्मिकपणे अतिरिक्त कर लावला. यासाठी उभ्या जगापुढे स्पष्ट केले की, मोदी सरकार युक्रेनपासून पाकिस्तानपर्यंतच्या विविध आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवर डोनाल्ड ट्रम्प यांची 'री' ओढत नसल्याने असे मुद्दाम करण्यात येत असल्याचे उद्दामपणे जाहीर केले. याला प्रत्युत्तर-प्रतिसाद म्हणून मोदींनी कुठल्याही दबावाला बळी न पडण्याची आपली भूमिका जगजाहीर केली व त्यावर ते ठाम राहिले. व्यावसायिक-व्यवस्थापनात आपले मुद्दे ठामपणे मांडतानाच त्याला धीरोदात्तपणे व ठोस भूमिकेची जोड देणे फार महत्त्वाचे ठरते. त्यातून संबंधित नेतृत्वाचे विषयाशी निगडित धीरोदात्त गांभीर्य स्पष्ट होते व त्यातून वाटाघाटी-चर्चेची व्यावसायिक इतिश्री संबंधितांच्या फायद्यात होते, हे विसरून चालणार नाही. नरेंद्र मोदींमधील हे सारे गुण यादरम्यान प्रकर्षाने स्पष्ट झाले.

दरम्यान, ट्रम्प यांच्या अवास्तव व अवाजवी दडपण-डरकाळ्यांना भीक न घालता मोदींनी युरोपीय देश-समूहांशी धूर्तपणे व्यापारी करार करून आणला. मोदींची ही व्यापारी-व्यावसायिक चाल बेजोड ठरली. यातून ट्रम्प आणि त्यांच्या अमेरिकी दडपणांना भीक न घालता, भारत आणि युरोपीय देशांनी परस्पर व्यापार संबंधांना मोठी चालना देण्याचे करार केले. यातूनच ट्रम्प यांचे सारे मनसुबे ढासळले व त्यांनी अखेर करारासाठी पुढाकार घेतला. ट्रम्प-मोदी कराराची मोठी फलश्रुती म्हणजे, अगदी सुरुवातीपासूनच नरेंद्र मोदींनी भारतीय कृषी, मत्स्योत्पादन क्षेत्राला संरक्षण देण्याचे ट्रम्प यांच्याकडून मान्य करवून घेतले. याशिवाय, सारे वाढीव कर ट्रम्प यांनी मागे घेतल्याने त्यांची पिछेहाट झाली, तर मोदींसह भारत वरचढ ठरला. यामागे अशी व्यवस्थापन धोरणाची पृष्ठभूमी महत्त्वाची ठरली.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

### अलर्ट राहणे गरजेचे आहे

अलीकडे सावधान, अलर्ट या सूचना वर्तमानपत्र, टीव्हीमध्ये सतत येत असतात. यामुळे सामान्य माणसाचा जीव कासावीस होतो. पूर्वी आपण जंगलातील वाघ-सिंहांना भीत होतो. आता त्यापेक्षा जास्त भीती माणसाची वाटते आहे. मनुष्य हा प्राणी होत आहे, हे स्पष्ट दिसू लागले आहे. घरातले पैसे-दागिने सुरक्षित नाही. बँकेतील पैसे-सोने-चांदीही असुरक्षित वाटते आहे. आता दोन प्रकारचे मानव-प्राणी समाजात निर्माण झाले आहेत. एक समाज'शील'प्राणी आणि दुसरे समाज'थ्रील' म्हणजे थरारक प्राणी. या समाजथ्रील प्राण्याला नियंत्रित करणे सरकार आणि त्यांच्या पोलिस खात्याला पूर्णपणे शक्य होत नाही. त्यामुळे अलर्टचा नारा द्यावा लागत आहे. पूर्वी असे समाजथ्रील प्राणी गरीब घरातले होते, परंतु आता हे प्राणी महागड्या कार-विमानात फिरतात आणि आपल्यासोबत इतर समाजथ्रील मानव प्राण्याला घेऊन लुटतात. हाव आणि हेवा यांनी ते ग्रासले असतात. सामाजिक थ्रील प्राणी कितीही दिवस जेलमध्ये राहू शकतात. मानव रूपातील प्राणी ऑनलाईन, ऑफलाईन; कधी भीती दाखवून तर कधी गोड बोलून लूट करतात. शिक्षा भोगून आल्यावर पुन्हा नवीन गुन्हे करतात. अशा थ्रील सामाजिक प्राण्यांवर मानसोपचार गरजेचा आहे. असे झाले तरच ते समाजशील मानव होऊ शकतात.

**शशिकांत पांडे**/७५८८७४१९९६

## वाचक पत्रे

### पोलिसांवर हल्ले करणाऱ्यास कडक शिक्षेची तरतूद हवी

तरुण भारतच्या २९ जानेवारीच्या अंकात 'पोलिसाला मारहाण करणाऱ्या दोन युवकांवर गुन्हे दाखल' ही बातमी वाचली. देशाचे अंतर्गत रक्षण करणाऱ्यास काही देशद्रोही युवक व इसम घोर अपमानित करतात व त्यांना मारहाण करून आपले अघोरी ईप्सित साध्य करण्याचा केविलवाणा प्रयत्न करतात. २७ जानेवारीला सकाळी आर्णी तालुक्यातील तेंडोळी येथील मातलेल्या दोन युवकांनी पेट्रोलिंगवर असणारे पोलिस नितीन वास्टर यांना शिवीगाळ करीत लाथाबुक्क्यांनी छातीवर मारले व त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली. हे दोन्ही युवक विद्यार्थिनींची छेड काढून टवाळकी करीत होते. यासंदर्भात वास्टर यांनी जाब विचारला असता या माथेफिरूंचे माथे फिरले व त्यांनी कर्तव्यावर असलेल्या कर्तव्यनिष्ठ पोलिसावर जीवघेणा हल्ला केला. महाराष्ट्रात ग्रामीण व शहरी भागात सातत्याने पोलिसांवर हल्ल्याचे प्रमाण वाढले आहे. हे हल्ले केवळ देशद्रोहीच करतात, असे आढळून आले आहे. ही सकस लोकशाहीच्या दृष्टीने अतिशय चिंतेची बाब आहे. या विकृतीला चाप लावावा, असे सुजाण नागरिकांना वाटतेय. शासनाने या हल्लेखोरांविरुद्ध कडक कारवाई करावी, तेव्हाच पोलिसांना खऱ्या अर्थाने न्याय मिळेल. नक्षलवादी, प्रत्येक क्षेत्रातील तस्कर, गुन्हेगार हे पोलिस विभागालाच टार्गेट करतात व कुटिल योजना आखतात. सन १९७० पासून त्या अगोदरच्या तुलनेत हे प्रमाण वाढलेले आहे. उत्तरप्रदेशातील गोरखपूर व परिसरात गोरगरीब तरुणींची देहव्यापारासाठी विक्री होत आहे. मुंबई, ठाणे व बहुतेक शहरात या तरुणींना देहव्यापारासाठी अड्ड्यांवर आणले जात आहे. देशातील मोठ्या शहरात सोन्या-चांदीची तस्करी वाढलेली आहे. आंतरराष्ट्रीय तस्करांनी आपल्या एजंटांकरवी तस्करीचे सोने व चांदी, हिरे व बहुमूल्य वस्तू देशातील बहुतांश व्यापाऱ्यांना विकण्याचा सपाटा लावला आहे. मौल्यवान खनिज उत्खनन व रेती तस्करांचे प्रमाण वाढलेले आहे. या सर्व गुन्हेगारांवर कायदेशीररीत्या कडक शिक्षा व्हावी, तेव्हाच देशात सुव्यवस्था नांदेल व सर्वसामान्य नागरिकांना व समग्र पोलिसांना यथोचित न्याय मिळेल.

**अरविंद महल्ले**/९७६६१९७३८३

### इथे ओशाळली सभ्यता

२० फेब्रुवारी २०२६, भारत मंडपम येथे झालेल्या जागतिक एआय समिटमध्ये जे घडले, ते पाहून वाटले की आपण प्रगती करत आहोत की अधोगती? ज्या वास्तूत जगातील राष्ट्राध्यक्ष आणि तंत्रज्ञानाचे दिग्गज मानवजातीच्या भविष्यावर मंथन करत होते, तिथेच काही राजकीय कार्यकर्त्यांनी अंगातील कपडे (टीशर्ट) काढून बीभत्स प्रदर्शन केले. या कृतीमुळे जागतिक नेत्यांसमोर देशाच्या प्रतिमेचे धिंडवडे निघाले, वैचारिक विरोधाची जागा आता अश्लीलतेने घेतली आहे का, असा प्रश्न निर्माण होतो. ज्या मंचावर विद्वत्तेचा कस लागत होता, तिथेच बाहेर 'निर्लज्जपणाचा' उत्सव साजरा झाला. 'तंत्रज्ञान माणसाला समृद्ध करण्यासाठी असते, संकुचित करण्यासाठी नाही. कपडे उतरवून क्रांती होत नसते, त्यासाठी विचारांची प्रगल्भता लागते.' हा केवळ एका पक्षाचा निषेध नाही, तर हा आपल्या संस्कृतीचा होत असलेला ऱ्हास आहे. आपण विचार करायला हवा की आपण पुढच्या पिढीला नेमके कोणते संस्कार देत आहोत?

**श्रीकांत तिजारे**/९४२३३८३९६६

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## पुसदच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. मोहिनीताई नाईक यांचे परळीत स्वागत

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)** | पुसद नगर परिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. मोहिनीताई इंद्रनील नाईक यांनी आज बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या प्रभू वैद्यनाथांचे दर्शन घेतले.



यावेळी परळी नगर परिषदेच्या नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी त्यांचे आदरपूर्वक स्वागत करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सौ. मोहिनीताई नाईक या नवनिर्वाचित नगराध्यक्षा म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर प्रभू वैद्यनाथांच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी परळी येथे आल्या होत्या. यावेळी परळी नगर परिषदेच्या वतीने नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई धर्माधिकारी यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचा यथोचित सत्कार केला. दोन्ही नगराध्यक्षांमध्ये यावेळी विविध विषयांवर चर्चा झाली. या भेटीदरम्यान स्नेह, समन्वय आणि विकासाच्या संकल्पनेतून दोन्ही नगरपरिषदांमधील सहकार्य अधिक दृढ व्हावे, अशी भावना दोन्ही लोकप्रतिनिधींनी व्यक्त केली.

## डॉ बिलास काळे यांच्या बँकिंग अँड इन्शुरन्स' पुस्तकाचे प्रकाशन



**माजलगाव प्रतिनिधी** | सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील वाणिज्य विभागाचे प्रा.डॉ. बिलास काळे लिखित बँकिंग अँड इन्शुरन्स' या पुस्तकाचे प्रकाशन प्राचार्य डॉ. जी. के. सानप यांच्या हस्ते संपन्न झाले. प्रा. डॉ.बिलास काळे यांचे बँकिंग अँड इन्शुरन्स' हे पुस्तक नवीन शैक्षणिक धोरणानुसार तयार करण्यात आले असून यामध्ये बँकिंग क्षेत्रातील मूलभूत संकल्पना सोप्या व सुलभ पद्धतीने मांडण्यात आल्या आहेत. तसेच डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठातील वाणिज्य विषयातील विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमासाठी सदरील पुस्तक उपयुक्त ठरणार आहे. विषयाची आवड असलेल्या सर्व विद्यार्थ्यांसाठी हे पुस्तक मार्गदर्शक ठरणार आहे. प्रकाशन सोहळ्या प्रसंगी प्राचार्य डॉ. जी. के. सानप, प्रभारी प्राचार्य डॉ. एन. के. मुळे, उपप्राचार्य डॉ. एम. ए. कव्हळे, उपप्राचार्य प्रा. पवनकुमार शिंदे, उपप्राचार्य प्रा. प्रकाश गवते, डॉ. सचिन रुद्रवार, डॉ नितीन ढवळे, प्रबंधक डॉ. प्रशांत चव्हाण तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

## वडीगोद्री केंद्रांतर्गत शिक्षण परीषद पाथरवाला खुर्द जि.प.शाळेत संपन्न

**अंबड** | विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देऊन सर्वांगीण विकास करावा असे आवाहन अंबड तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी श्री रवी कवडे यांनी वडीगोद्री केंद्रांतर्गत शिक्षण परिषदेमध्ये (दि.२०) शिक्षकांना केले.यावेळी आयोजित कार्यक्रमात मंचावर पाथरवाला खुर्द येथील शाळा व्यवस्थापन समिती पदाधिकारी उपाध्यक्ष आप्पासाहेब पाचुंदे,सुभाष बेहडे,सरपंच विठ्ठलराव सुडके,शिक्षण विस्तार अधिकारी दिनेश शिनगारे,केंद्रप्रमुख दत्ता भापकर,विषयतज्ञ अशोक पवार उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यानंतर नविन पुनर्गठीत शालेय व्यवस्थापन समिती व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात केंद्रप्रमुख दत्ता भापकर यांनी वडीगोद्री केंद्रांतर्गत चाललेल्या उपक्रमांचा आढावा घेतला तसेच गुणवत्ता वाढीसाठी शाळा व्यवस्थापन समितीचे योगदान याविषयी मार्गदर्शन केले.शिक्षण विस्तार अधिकारी दिनेश शिनगारे यांनी निपुण चाचणी,व्ही.एस.के.ॲप उपस्थिती,वार्षिक तपासणी,कॉपीमुक्त परीक्षा अभियान याबाबत मार्गदर्शन केले. गटशिक्षणाधिकारी रवी कवडे यांनी विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण दर्जेदार शिक्षण देऊन सर्वांगीण विकास साधण्याचे आवाहन करत शैक्षणिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## नवीन नाल्या, रस्ते आणि पथदिव्यांच्या रोषणाईने प्रभाग ४ उजळला

तभा. वृत्तसेवा

**परळी, प्रतिनिधी** | परळी नगरपरिषदेत प्रथमच निवडून आलेल्या नगरसेविका मीरा केशव नागरगोजे यांनी माजी मंत्री धनंजय मुंडे, मंत्री पंकजा मुंडे तसेच परळी नगर परिषदेच्या नगराध्यक्षा पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाग क्रमांक ४ च्या सर्वांगीण विकासासाठी ठोस पावले उचलत विकासकामांचा धडाका लावला आहे. अत्यावश्यक सुविधांना प्राधान्य देत नवीन नाल्यांचे बांधकाम, रस्त्यांचे मजबुतीकरण तसेच नवीन विजेचे पोल उभारून पथदिव्यांची विद्युत रोषणाई करण्याच्या कामांना वेग देण्यात आला आहे.

नागरिकांच्या दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या समस्या लक्षात घेऊन नागरगोजे यांनी थेट रस्त्यावर उतरून कामांची पाहणी सुरू केली आहे. विशेषतः सावता माळी मंदिर परिसर, धनगर गल्ली, उखळवेस, विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसर, चाभारवाडा, बिडकर गल्ली, मल्हार नगर, साठे नगर आदी भागांत नाल्या व रस्त्यांच्या कामांना प्रारंभ झाला असून अनेक ठिकाणी पथदिव्यांची उभारणी पूर्णत्वाकडे जात आहे.

पावसाळ्यात साचणारे पाणी, खराब रस्त्यांमुळे होणारे अपघात आणि अपुरी प्रकाशव्यवस्था यामुळे नागरिक त्रस्त होते. मात्र आता नव्याने



उभारण्यात येणाऱ्या सिमेंट कॉंक्रीट नाल्या व रस्त्यांमुळे पाणी साचण्याचा प्रश्न मार्गी लागणार असून, नव्या विजेच्या पोलसह बसविण्यात येणाऱ्या पथदिव्यांमुळे परिसरात सुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.

मीरा नागरगोजे यांनी सांगितले की, "प्रभागातील मूलभूत सुविधा हीच आमची प्राथमिकता आहे. नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित आणि प्रकाशमान वातावरण मिळावे यासाठी टप्प्याटप्प्याने सर्व भागांत कामे पूर्ण केली जातील."

"अनेक वर्षांपासून रखडलेली कामे आता प्रत्यक्षात सुरू झाल्याने दिलासा मिळाला आहे," अशी प्रतिक्रिया काही नागरिकांनी दिली.

आगामी काळात आणखी सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्धार नगरसेविका नागरगोजे यांनी व्यक्त केला आहे.

# अंबाजोगाईत अवकाळी पाऊस तर मुडेगाव परिसरात गारपीट : जनजीवन विस्कळीत...!









तभा. वृत्तसेवा

**अंबाजोगाई** | अंबाजोगाई शहरासह तालुक्यात आज दुपारनंतर अचानक झालेल्या अवकाळी पावसाने जनजीवन विस्कळीत झाले. काही भागांत जोरदार वाऱ्यासह पावसाच्या सरी कोसळल्याने नागरिकांची धावपळ उडाली. अचानक आलेल्या पावसामुळे बाजारपेठेतील व्यापाऱ्यांची तारांबळ उडाली, तर दुचाकीस्वार आणि पादचारी यांना आसरा शोधावा लागला.

अंबाजोगाई तालुक्यातील ग्रामीण भागातही पावसाचा फटका बसला असून काही ठिकाणी उभ्या पिकांचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. विशेषतः गहू आणि हरभरा पिकांवर परिणाम झाल्याची शेतकऱ्यांकडून तक्रार करण्यात येत आहे. जोरदार वाऱ्यामुळे काही ठिकाणी वीजपुरवठाही खंडित झाला. दरम्यान, नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

दरम्यान अंबाजोगाई तालुक्यातील मुडेगाव येथे आज दिनांक २३ फेब्रुवारी, सोमवार रोजी वादळी वाऱ्यासह गारांचा जोरदार पाऊस दुपारी तीन ते चार दरम्यान झाला. यामुळे रब्बी पीक गहू, हरभरा, ज्वारी चे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. गारपिटीने झालेल्या पिकांचे नुकसान झालेल्या पिकांचा तहसील कार्यालयाकडून पंचनामा करण्यात यावा अशी मागणी गावकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

## चिंचोली माळीच्या शिरपेचात मानाचा तुरा

तभा. वृत्तसेवा

**केज** | तालुक्यातील चिंचोली माळी येथील रहीवाशी कु. दिपाली सरिता राजेंद्र राऊत या युवतीला काव्यमित्र संस्थेच्या वतीने आयोजित छत्रपती शिवाजी महाराज व राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या जयंती निमित्त पुणे येथे राष्ट्रीय युवाचेतना पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.

याविषयी सविस्तर वृत्त असे की जिद्द, चिकाटी, मेहनत व सातत्यपुर्ण प्रयत्नाने ग्रामीण भागात राहुन, तसेच वडिलांचे छत्र हरपलेले असताना देखील न डगमगता स्वतः च्या पायावर उभारण्याची आस मनी बाळगून केज तालुक्यातील चिंचोली



माळी येथील रहीवाशी कु. दिपाली राऊत हिने शेवग्याच्या पाल्यापासुन मोरींगा पावडर, कडीपत्ता पावडर तसेच वेगवेगळ्या प्रकारचे उत्पादन तारिणी उद्योगसमुहाच्या माध्यमातून सुरु केले आहे. आणि या उद्योग समुहाची यशस्वी वाटचाल चालू आहे. याची दखल घेऊन पुणे येथील काव्यमित्र संस्थेच्या वतीने आयोजित छत्रपती शिवाजी महाराज व राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या जयंती निमित्त राष्ट्रीय युवाचेतना पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.

या कार्यक्रमाचे मुख्य संयोजक श्री. राजेंद्र विमलाई श्रीमंत सगर (संस्थापक अध्यक्ष , काव्यमित्र संस्था) हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून मा. श्री. संभाजीराजे जाधवराव (सिंदखेड, राजे लखोजी जाधवराव यांचे १४ वे वंशज) हे होते. व मा. श्री.व्ही. जे. वाघमारे सर (राज्याध्यक्ष- विस्तार अधिकारी पंचायत समाजकल्याण व आय.आर. डी.पी.संघटना) यांच्या शुभहस्ते राष्ट्रीय युवाचेतन पुरस्कार हा मानाचा पुरस्कार तारिणी उद्योग समूह ला प्रदान करण्यात आला.

यावेळी बोलताना हा पुरस्कार आमच्यासाठी अत्यंत अभिमानास्पद आणि प्रेरणादायी क्षण आहे. समाजासाठी गुणवत्ता, प्रामाणिकपणा आणि स्वावलंबन या तत्त्वांवर काम करत राहण्याची ही मोठी पावती आहे.

## पूर्णवादी बँकेचा ४१ वा वर्धापन दिन उत्साहात संपन्न



तभा. वृत्तसेवा

**बीड** | पूर्णवादी नागरिक सहकरी बँकेचा ४१ वा वर्धापन दिन पूर्णवादी बँकेच्या मुख्य कार्यालयात उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने सायंकाळी ५:०० ते ७:३० या वेळेत बँकेचे सर्व ग्राहक, सभासद, हितचिंतक यांच्याशी हितगुज साधण्यासाठी चहा पानाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

दि. २३/०२/१९८५ रोजी बँकेची स्थापना झाली. गेली ४१ वर्षे बँक सातत्य, सचोटी, सहकार, समृद्धी हे ब्रीद घेऊन अविरत सेवा देत आहे. आजमितीला बँकेच्या एकूण २५ शाखा आहेत. या ४१ वर्षांच्या प्रवासात बँकेसोबत अनेक ग्राहक, सभासद जोडले गेले आहेत. बँकेच्या ४१ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ॲड. कालिदासराव थिगळे, ॲड. विजयकुमार देशपांडे, ह. भ. प. श्री विनायक महाराज पाटांगणकर, नगरसेवक श्री परशुराम गुरखूदे, नगरसेवक श्री सागर देशपांडे, श्री चंद्रकांत नवले, ॲड. किर्ती जोशी, ॲड. शार्दुल देशपांडे, ॲड. अमृत पाठक, व्यवसायिक श्री सुनीलसेठ कोटेचा, श्री राजूसेठ मुनोत, श्री कैलास मैड, श्री संतोष सारडा, श्री उज्वल कोटेचा, श्री प्रमोद निनाळ, श्री अजिंक्य बनसोडे, भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, प्रा. श्री चंद्रकांत मुळे, इंजि. श्री रमेश ढाकणे, इंजि. श्री रोहित कोलंगडे, श्री सुहास लाऊळकर, श्री नारायण धांडे, श्री सुनील थिगळे, श्री आर. के. थिगळे, श्री महेंद्र कलंत्री, श्री अविनाश कलंत्री, श्री कैलास कलंत्री, श्री जगदीश मंत्री, पत्रकार श्री महेश वाघमारे, श्री दिलीप खिस्ती, श्री सुनील क्षीरसागर, श्री प्रमोद कुलकर्णी, श्री लक्ष्मीकांत रूईकर, डॉ. पी. के. कुलकर्णी, डॉ. सीमा जोशी, डॉ. अंजली नाईकवाडे, डॉ. सुवर्णा जायभाये, डॉ. विनोद ओस्तवाल, डॉ. अजय जाधव, डॉ. साहेबराव भोपळे, डॉ. प्रशांत सानप, श्री वासुदेवराव हुलजुते, श्री जीवनराव सानप, श्री रमेश ढाकणे, श्री राजेंद्र जाधव, श्री भारत पाखरे, सीए श्री अमर्त्य खंडेलवाल, श्री रवींद्र खंडेलवाल, श्री अनिल घुमरे, श्री बालाजी पवार, श्री सुहास पाटील तसेच बँकेचे इतर सभसद, ग्राहक, हितचिंतक व मान्यवर यांनी उपस्थित राहून बँकेच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

बँकेच्या ४१ व्या वर्धापन दिनानिमित्ताने सकाळी बँकेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री प्रल्हाद राजुरीकर यांच्या हस्ते सपत्नीक सत्यनारायनाची पूजा संपन्न झाली, या प्रसंगी बँकेचे अध्यक्ष डॉ. सुभाष जोशी, बँकेचे संचालक डॉ. विवेक पालवनकर, डॉ. सौ. सुरेखा देशमुख, इंजि. श्री महादेव हुलजुते, श्री विश्वंभर थिगळे, प्रा. श्री ज्योतीश्वर भालेराव, व्यवस्थापन मंडळ अध्यक्ष सीए श्री सुरेश लड्डा, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री राजेश कुलकर्णी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री प्रल्हाद राजुरीकर, सरव्यवस्थापक श्री महेश पारगांवकर, मुख्य शाखेचे व्यवस्थापक श्री दीपक खिस्ती, मोंढा शाखेचे व्यवस्थापक श्री संजय देशमुख, नगर रोड शाखेचे व्यवस्थापक श्री विजय कोटुळे तसेच बँकेचे इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## इतिहास संकलन संस्था (समिती) महाराष्ट्र राज्य (देवगिरी प्रांत) इतिहास संकलन संस्था (समिती) बीड जिल्हा बैठक संपन्न

तभा. वृत्तसेवा

**बीड (प्रतिनिधी )** | दिनांक २२ फेब्रुवारी २०२६ रोजी अखिल भारतीय इतिहास संकलन योजना नवी दिल्ली संलग्न इतिहास संकलन संस्था (समिती) महाराष्ट्र राज्य (देवगिरी प्रांत ) इतिहास संकलन संस्था (समिती) बीड जिल्हा बैठक डॉ हेडगेवार सार्वजनिक वाचनालय बीड येथे संपन्न झाली . मा.प्रा. डॉ.राधाकृष्ण जोशी,प्रा.शशिकांत पसारकर व पालक श्री.प्रमोदराव कुळकर्णी यांच्या उपस्थितीत व



अध्यक्ष श्री.जयंतराव अकोलकर यांच्या अध्यक्षतेखाली बीड जिल्हा कार्यकारीणी नियुक्त करण्यात आली. उपाध्यक्ष श्री.उदय पाठक,श्री. पांडुरंग रणखांब,शाखा सचिव - श्रीकृष्ण जोशी , संघटन सचिव - मुकुंद कुलकर्णी , कोषाध्यक्ष - विनायक कुलकर्णी,प्रचार प्रमुख - डॉ.राहुल पांडव, लेखन प्रमुख - संजय डोळे,जगदीश शेळके , सहसचिव- सुनील मोगरेकर, कार्यक्रम नियोजन प्रमुख प्रा. सुहास जोशी. मार्गदर्शक श्री. नंदकिशोर झरीकर यावेळी बैठकीत विविध विषयावर चर्चा होवून वार्षिक कार्यक्रम नियोजन करण्यात आले संघ शताब्दी वर्षनिमित् विशेष कार्यक्रम राबवण्याचे ठरवले. जिल्ह्यातील स्वातंत्र्य सैनिक यांचे घरी भेट देऊन त्यांचे वारसाशी संवाद साधणे. विवीध ऐतिहासिक स्थळांना भेटी देणे ,माहिती संकलित करणे. असे ठरले आहे. सर्व नूतन कार्यकारिणीचे स्वागत करण्यात आले. बैठकीचे आभार सचिव श्री. श्रीकृष्ण जोशी यांनी मानले.

## म्हणजे शाश्वत विकासाचा मार्ग - डॉ.उपेंद्र कुलकर्णी

तभा. वृत्तसेवा

**बीड (प्रतिनिधी)** | देशात शाश्वत विकास जर साधायचा असेल तर पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी मांडलेल्या एकात्म मानवदर्शनाचा मार्ग हा सर्वोत्तम आहे असे प्रतिपादन कृषी विज्ञान केंद्राचे प्रकल्प संचालक डॉ. उपेंद्र कुलकर्णी यांनी केले. येथील स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयात आयोजित एकात्म मानवदर्शन राष्ट्रीय सांगोष्टीच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर संस्थेचे कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, सावरकर संकुलाचे अध्यक्ष डॉ. पि.के. कुलकर्णी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे, सांगोष्टीचे निमंत्रक डॉ.हंसराज जोशी, आयोजन सचिव डॉ.अनंत देशपांडे यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. उपेंद्र कुलकर्णी म्हणाले की पंडितजींनी देशातील सर्व घटकांचा सर्व परिस्थितीचा विचार करून मानव जातीच्या समग्र विकासाची संकल्पना मांडली. माणसाला व्यक्तीला समोर ठेवून त्यांनी केलेले हे चिंतन आहे. एकात्म मानवदर्शन शाश्वत विकासाचे मॉडेल आहे. कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य म्हणाले पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी भारतीय समाजाचा विचार करून सर्वांच्या प्रगतीसाठी हे सूत्र मांडले.

त्यांच्या या चिंतनाला आज साठ वर्षे पूर्ण झाले आहेत. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे विचार प्रेरणादायी आहेत. हंसराज जोशी यांनी या प्रसंगी दिवसभरातील सत्रांचा आढावा मांडला. यावेळी उपस्थित सहभागी प्रतिनिधींच्या वतीने डॉ. रवी साठभाई, प्रा. सोनू गवळी यांनी मनोगत व्यक्त केले. समारोप कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सचिन कंदले यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी, कॉन्फरन्स साठी उपस्थित प्रतिनिधी, विद्यार्थी उपस्थित होते.

# गाव समूहाचा शेतकरी कीर्तन महोत्सव यंदा ही रंगणार

### किरण माने, मयांक गांधी, विलास बडे, पैगंबर शेख, स्वप्निल चौधरी, अजित अभ्यंकर यांच्यासह अनेकांची उपस्थिती

तभा. वृत्तसेवा

**परळी / प्रतिनिधी** | शाश्वत शेती, माती आणि माणूस याला केंद्रभूत मानून तुकाराम बीजेनिमित्ताने मागील ४ वर्षांपासून परळी, अंबाजोगाई व धारूर तालुक्यातील २५ पेक्षा अधिक गावातील शेतकऱ्यांनी एकत्र येत सुरू केलेला शेतकरी कीर्तन महोत्सव जिल्ह्यातील अभिनव प्रबोधन महोत्सव म्हणून ओळखला जात असून या किर्तन महोत्सवाची महाराष्ट्रभर उत्सुकता असते. यावर्षीच्या शेतकरी कीर्तन महोत्सवात सुप्रसिद्ध अभिनेते किरण माने, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मयांक गांधी, ज्येष्ठ पत्रकार विलास बडे, सामाजिक कार्यकर्ते पैगंबर शेख, प्रसिद्ध कवी डॉ. स्वप्निल चौधरी, जेष्ठ अर्थतज्ञ डॉ. अजित अभ्यंकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मार्गदर्शन करणार असल्याची माहिती शेतकरी कीर्तन महोत्सवाचे संयोजक एड. अजय बुरांडे यांनी दिली.

जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या बिजोत्सवाच्या निमित्ताने २८ फेब्रुवारी ते ६ मार्च यादरम्यान यावर्षीचा शेतकरी कीर्तन महोत्सव होत आहे. जगद्गुरु तुकाराम महाराजांचा बीजोत्सव जवळ येऊ लागतो तसा परळी तालुक्यासह इतर तालुक्यातील शेतकऱ्यांना कीर्तन महोत्सवाची उत्सुकता लागून राहते. धारूर तालुक्यातील कान्नापूर येथे होणाऱ्या कीर्तन महोत्सवात पारंपारिक




कीर्तनाबरोबरच शेतकऱ्यांचे प्रश्न, त्यांचे आरोग्य, शेतीवर होणारे पर्यावरणाचे परिणाम, शेतकऱ्यांची सामाजिक, आर्थिक स्थिती आणि त्यांच्या जीवनात बदल घडवण्यासाठी कराव्या लागणाऱ्या उपाययोजना, यावर या शेतकरी कीर्तन महोत्सवात विचार मंथन होत असते. शेतकरी कीर्तन महोत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे उच्च दर्जाचे वैचारिक प्रबोधन होत असतानाच या कीर्तन महोत्सवातून सर्वसामान्यांचे आर्थिक शोषण होणार नाही याची काळजी घेतली जाते. २५ गावांचा हा कीर्तन महोत्सव असला तरी अत्यंत साधेपणाने तितकेच नेटकेपणा याचे आयोजन केले जाते. भपकेबाजपणा टाळण्यासाठी दररोज एका गावातून भाकरी गोळा केल्या जातात. कीर्तन मंडपात एखादी भाजी तयार केली जाते. आपल्या घरातील एक भाकर शेतकरी कीर्तन महोत्सवाला जाते आहे या भावनेतून ही सर्व कुटुंब शेतकरी महोत्सवाशी जोडले जातात. हा नवा प्रयोग गेली चार वर्षे कान्नापूर परिसरात केला जातो.

यावर्षी या कीर्तन महोत्सवात दिग्गज प्रबोधनकारांचे आणि कीर्तनकारांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

शनिवार दि २८ रोजी या सोहळ्याचे उद्घाटन सुप्रसिद्ध अभिनेते आणि समाजभान असणारे सामाजिक कार्यकर्ते किरण माने, कैकाडी महाराज मठाचे प्रमुख भारत महाराज जाधव, जागतिक कीर्तीचे मृदंग वादक उद्धव बापू आपेगावकर यांची उपस्थिती असणार आहे. तसेच शेतकऱ्यांचे प्रश्न स्वतः शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन मांडणारे, प्रसंगी कमरे इतक्या पाण्यात उतरून वस्तुस्थिती जगासमोर आणणारे पत्रकार विलास बडे, विविध प्रयोगाच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न करणारे मयांक गांधी, शेतकऱ्यांच्या आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नावर थेट भूमिका घेणारे पैगंबर शेख, सुप्रसिद्ध कवी डॉ. स्वप्निल चौधरी, जेष्ठ अर्थतज्ञ डॉ. अजित अभ्यंकर यांची यावर्षी व्याख्याने होणार आहेत. मधुकर महाराज बारूळकर, अविनाश महाराज भारती, जनक महाराज सोळंके, गणपत महाराज पवार, एकनाथ महाराज माने , ज्ञानेश्वर महाराज बंडगर यांची कीर्तने होणार आहेत, तर शामसुंदर महाराज सोन्नर यांच्या काल्याचे किर्तनाने या कीर्तन महोत्सवाची सांगता होईल, अशी माहिती शेतकरी एड.अजय बुरांडे यांनी दिली.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## अवैध गोवंशीय मांस जप्त; एकावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ फेब्रुवारी -**



परंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैधरीत्या कत्तल केलेले गोवंशीय मांस बाळगल्याप्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी शहानवाज खॉजा कुरेशी (वय २६, रा. कुरेशी गल्ली, परंडा ता. परंडा जि. धाराशिव) याच्या ताब्यातून दि. २२ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी सुमारे ८.३० वाजण्याच्या सुमारास १०० किलो अवैध कत्तल केलेले गोवंशीय मांस जप्त करण्यात आले. जप्त केलेल्या मांसाची अंदाजे किंमत २०,००० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

या प्रकरणी परंडा पोलिसांनी सरकारतर्फे संबंधित आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास परंडा पोलीस ठाणे करीत आहेत.



## संक्षिप्त वृत्त...

### २७ फेब्रुवारीला मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा

**धाराशिव, दि.२४ फेब्रुवारी -**

ज्येष्ठ कवी वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त २७ फेब्रुवारी रोजी मराठी भाषा गौरव दिन



उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव, जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय तसेच शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक) जिल्हा परिषद धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. घेवू या एकच वसा, मराठीला बनवू या ज्ञानभाषा ही यंदाची मध्यवर्ती संकल्पना असून, मराठी भाषेच्या गौरवासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, धाराशिव येथे 'मातृभाषेचे व्यक्तीगत व समाजजीवनातील स्थान' या विषयावर मराठी भाषा साहित्य परिसंवाद व व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांचा लाभ जिल्ह्यातील नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

### सहा वर्षांच्या हसनेनने पूर्ण केला पहिला रमजानचा रोजा

**मंगरूळ, दि.२४ फेब्रुवारी -**

पवित्र रमजान महिन्यात श्रद्धा, संयम आणि सबुरीला विशेष महत्त्व असते. गालिब नगर, धाराशिव येथील



अवघ्या सहा वर्षांच्या हसनेन नय्यूम शेख याने आपल्या आयुष्यातील पहिला रोजा (उपवास) पूर्ण करून कुटुंबियांचा अभिमान वाढवला आहे. लहान वयातच धार्मिक संस्कार जोपासत हसनेनने पहाटेच्या सहरीपासून संध्याकाळच्या इफ्तारपर्यंत पूर्ण दिवस रोजा पाळला. दिवसभर आनंदी चेहऱ्याने आणि कोणतीही तक्रार न करता त्याने हा रोजा पूर्ण केल्याने परिसरात त्याचे कौतुक होत आहे. कुटुंबियांनी सांगितले की, रमजान महिन्यात लहान मुलांमध्ये धार्मिक संस्कार, शिस्त आणि संयम यांची जपणूक व्हावी, यासाठी हसनेनचा हा पहिला रोजा प्रेरणादायी ठरत आहे.

### मोहा शिवारातून तीन म्हशींची चोरी

**धाराशिव, दि.२४ फेब्रुवारी -**

मोहा (ता. कळंब) येथील शेतातून तीन म्हशी चोरीस गेल्याची घटना उघडकीस आली असून कळंब पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,



फिर्यादी सुमंत उर्फ बाळासाहेब किसन कसबे (वय ५०, रा. मोहा ता. कळंब जि. धाराशिव) यांच्या शेत गट क्रमांक ४६९ मधील पत्र्याच्या उघड्या शेडमधून ३ मुरा जातीच्या म्हशी अज्ञात व्यक्तीने चोरून नेल्या. ही घटना दि.१५ फेब्रुवारी रोजी घडली. चोरीस गेलेल्या म्हशींची एकूण किंमत अंदाजे ७५,००० रुपये असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी फिर्यादी सुमंत कसबे यांनी दि.२२ फेब्रुवारी रोजी दिलेल्या प्रथम माहितीनुसार कळंब पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

### गुंजोटी येथे घरफोडी; दागिने लंपास

**उमरगा, दि.२४ फेब्रुवारी -**

गुंजोटी (ता. उमरगा) येथे घरफोडीची घटना घडून सुमारे दीड लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरीस गेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी उमरगा पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी अजित भानुदास चौधरी (वय ३३, रा. गुंजोटी ता. उमरगा) यांच्या जुन्या घराच्या समोरील दरवाजाचे कुलूप अज्ञात व्यक्तीने दि.२० फेब्रुवारी रोजी मध्यरात्री १२ ते दि.२१ फेब्रुवारी रोजी सकाळी ६ या कालावधीत तोडले. त्यानंतर घरात प्रवेश करून सुमारे तीन तोळे सोन्याचे दागिने, एकूण अंदाजे १,५०,००० रुपये किमतीचा ऐवज चोरून नेला. या प्रकरणी उमरगा पोलिसात गुन्हा दाखल केला आहे.

# राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमात धाराशिव राज्यात प्रथम

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ फेब्रुवारी -**

सन २०२५-२६ या वर्षातील राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम अंतर्गत उत्कृष्ट कार्याबद्दल धाराशिव जिल्ह्याने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. एप्रिल २०१५ ते डिसेंबर २०२५ या कालावधीतील कामाचे राज्यस्तरावर मूल्यमापन करण्यात आले. नव्या रुग्णांचा शोध, रुग्ण सहवासितांना दिलेली पीईपी (रिफाम्पीसीनची एक मात्रा), डीपीएमआर सेवा, विकृती पुनर्रचनात्मक शस्त्रक्रिया व निर्देशांकानुसार काम या बाबींचा विचार करण्यात आला.

या मूल्यमापनात धाराशिव जिल्ह्यास प्रथम, सातारा जिल्ह्यास द्वितीय तर चंद्रपूर जिल्ह्यास तृतीय क्रमांक देण्यात आला. उल्लेखनीय कार्याबद्दल धाराशिवची 'वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्य रत्न' पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. सहाय्यक संचालक आरोग्य सेवा (कुष्ठरोग) डॉ. मारुती रामराव कोरे यांची या पुरस्कारासाठी निवड होऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

पुरस्कार वितरण समारंभ २२ फेब्रुवारी २०२६ रोजी मंत्रालय, मुंबई येथे पार पडला. यावेळी सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर व आरोग्य राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रमास सार्वजनिक आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. बनसोडे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. फुलारी, उपजिल्हा रुग्णालय कळंबचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. धर्माधिकारी तसेच कार्यक्रमातील कर्मचारी उपस्थित होते. जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी वेळोवेळी बैठका घेऊन मार्गदर्शन केल्याने रुग्ण शोध मोहिमा प्रभावीपणे राबविण्यात आल्या.

डॉ. मारुती कोरे यांनी सांगितले की, जिल्हा परिषद आरोग्य विभाग, जिल्हा शल्यचिकित्सक, उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालयांचे सहकार्य आणि कर्मचाऱ्यांच्या अथक प्रयत्नांमुळे हे यश शक्य झाले. लवकर निदान, नियमित बहुविध औषधोपचार व सहवासितांना वेळेत पीईपी दिल्यामुळे सर्व नवीन रुग्ण विनाविकृती अवस्थेत शोधण्यात यश आले आहे.



जानेवारी २०२६ अखेर ३९५ नवीन रुग्ण शोधून उपचार सुरू, नोव्हेंबर-डिसेंबर २०२५ 'कुष्ठरुग्ण शोध अभियान'मध्ये १४१ नवीन रुग्ण, ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२६ दरम्यान 'स्पर्श कुष्ठरोग जनजागृती पंधरवडा' राबविण्यात आला. २३,७५२ नागरिकांची तपासणी; ५७१ संशयित रुग्ण शोधले. ३१ नवीन रुग्णांचे निदान निश्चित; त्यापैकी १९ रुग्ण बाहेरील जिल्हे/राज्यांतील.

कुष्ठरोग 'नोटिफायबल डिसीज' घोषित करण्यात आल्याने खाजगी दवाखान्यांतील नवीन रुग्णांची माहिती आरोग्य विभागास देणे बंधनकारक आहे. शासनाचे २०२७ पर्यंत 'शून्य कुष्ठरोग प्रसार' हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी समाजात दडलेले रुग्ण शोधून त्यांच्यावर तत्काळ उपचार सुरू करणे व सहवासितांना पीईपी देणे अत्यावश्यक असल्याचे डॉ. कोरे यांनी नमूद केले.

कुष्ठरोगाची लक्षणे आढळल्यास त्वरित जवळच्या शासकीय रुग्णालयात तपासणी व उपचार घ्यावेत, असे आवाहनही त्यांनी केले.

## नळदुर्गमध्ये नव्याने मटका बुकी सुरू; पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२४ फेब्रुवारी -**

नळदुर्ग शहरातील काही राजकारणात सक्रिय असलेल्या मंडळींकडून शहरात नव्याने मटका बुकी सुरू करण्यात आल्याची चर्चा रंगली आहे. राजकीय दबावामुळे पोलिस प्रशासन याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, शहरातील जगतापनगर परिसरात मटक्याचे कार्यालय सुरू करण्यात आले असून तेथून नळदुर्ग शहर व परिसरात एजंट नेमून मटका घेण्याचे काम सुरू आहे. निवडणुकांचा हंगाम संपल्यानंतर काही मंडळींनी हा अवैध व्यवसाय सुरू केल्याची चर्चा शहरात सुरू आहे.

नळदुर्गमध्ये अनेक वर्षांनंतर पुन्हा मटका बुकी सुरू झाल्याचे बोलले जात आहे.

यापूर्वी शहरात सुरू असलेल्या मटका व्यवसायाचे चालक बाहेरील असल्याचे सांगितले जात होते; मात्र नव्याने सुरू झालेल्या बुकीचे चालक हे शहरातीलच आणि राजकारणात सक्रिय असलेले असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे पोलिस प्रशासन या प्रकरणाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याची भावना नागरिकांत व्यक्त होत आहे.

या मटका बुकीला नेमका कुणाचा आशिर्वाद आहे, याबाबत शहरात विविध चर्चा रंगल्या आहेत. मटका व्यवसाय अनेक कुटुंबांचे संसार उध्वस्त करणारा असल्याने शहरातून हा व्यवसाय हद्दपार करण्यासाठी ठोस कारवाई होणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे मत आहे. परंतु काही स्थानिक मंडळींकडूनच हा व्यवसाय सुरू झाल्याने हा विषय शहरात चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे.

पोलिस प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन नव्याने सुरू झालेली मटका बुकी बंद करावी व संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

### शेतरस्त्याच्या वादातून मारहाण

**धाराशिव, दि.२४ फेब्रुवारी -**

शेतरस्त्याच्या कारणावरून झालेल्या वादातून एका व्यक्तीसह त्याच्या नातेवाईकांना मारहाण केल्याप्रकरणी बेंबळी पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि.२२ फेब्रुवारी रोजी केशेगाव येथील विठ्ठलवाडी शिवारात आरोपी सागर बबन शिंदे व संतोष बबन शिंदे यांनी फिर्यादी नागेश सिद्धेश्वर वाघाळे यांचा रस्ता अडवून शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी व काठीने मारहाण केल्याची तक्रार आहे.

## बावची विद्यालयात येथे 'घर घर संविधान' रथ यात्रेचे स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ फेब्रुवारी -**

बावची विद्यालय, परंडा येथे महाराष्ट्र शासनच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत आयोजित 'घर घर संविधान' रथ यात्रेचे प्रार्थनेच्या वेळी उत्साहात आगमन झाले.



विद्यालयात रथ यात्रेचे उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी रथासोबत आलेल्या कलाकारांनी प्रभावी व संदेशपूर्ण पथनाट्य सादर केले. पथनाट्यातून भारतीय संविधानाचे महत्त्व, नागरिकांचे अधिकार व कर्तव्ये याविषयी माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये संविधानाबद्दल जागरूकता निर्माण करण्याचा हा उपक्रम प्रेरणादायी ठरला.

कार्यक्रमादरम्यान विद्यालयाचे प्राचार्य नारायण खैरे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. शिक्षक व विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी राष्ट्रध्वजाचा सन्मान राखण्याची व संविधानाचे पालन करण्याची प्रतिज्ञा व्यक्त केली. या कार्यक्रमामुळे विद्यालय परिसरात देशभक्तीचे वातावरण निर्माण झाले.

## जीवे मारण्याच्या धमक्यांमुळे शेतकरी दाम्पत्याचा आत्मदहनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२४ फेब्रुवारी -**

तुळजापूर तालुक्यातील मानेवाडी येथील वयोवृद्ध शेतकरी भास्करराव व्यंकटराव घुगे व त्यांच्या पत्नी कौशल्याबाई घुगे यांच्या शेतजमिनीवर अतिक्रमण करून पिकांची नासधूस व जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात असल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे.

या प्रकरणी संबंधित दाम्पत्याने दि.२३ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार अर्ज सादर केला असून, वेळेत न्याय न मिळाल्यास १५ दिवसांनंतर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा टोकाचा इशारा दिला आहे.

**सोयाबीन, उडीद व तुरीचे पीक जबरदस्तीने काढून नेल्याचा गंभीर आरोप**

तक्रार अर्जात नमूद केल्याप्रमाणे, वयोवृद्ध व आजारी असल्याचा गैरफायदा घेत काही व्यक्तींनी संगनमताने त्यांच्या शेतात बेकायदेशीर प्रवेश केला. संबंधितांनी सोयाबीन, उडीद व तुरीचे पीक जबरदस्तीने काढून नेल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

यास विरोध केल्यावर संबंधितांनी शिवीगाळ व दमदाटी करत पुन्हा शेतात आल्यास जीवे मारून याच जमिनीत गाडून टाकण्याची धमकी दिल्याचेही अर्जात म्हटले आहे.

घुगे दाम्पत्याने प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून अतिक्रमण हटवावे, पिकांचे नुकसान भरपाई द्यावी व धमकी देणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

दरम्यान, या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून प्रशासन या प्रकरणी कोणती कारवाई करते, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

## वाघ यांच्यावर हल्ल्याचा नळदुर्गमध्ये निषेध; हल्लेखोरांवर कठोर कारवाईची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२४ फेब्रुवारी -**

बुलढाणा जिल्ह्यातील चिखल काकडा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळा उभारणीच्या पार्श्वभूमीवर मराठा भगिनी संजीवनी वाघ यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा नळदुर्ग शहर सकल मराठा समाजाच्या वतीने जाहीर निषेध करण्यात आला. संबंधित हल्लेखोरांवर कठोर कारवाई करावी, या मागणीचे निवेदन नळदुर्ग पोलिस ठाण्यात देण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, चिखल काकडा (जि. बुलढाणा) येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविण्यात आल्यानंतर समाजकंटकांकडून भ्याड हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात मराठा भगिनी संजीवनी वाघ यांना मारहाण करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला असून, ही घटना महाराष्ट्राच्या प्रतिमेला काळिमा फासणारी असल्याचे निवेदनात म्हटले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रात महिलांवर हल्ला होणे अत्यंत दुर्दैवी असल्याचे नमूद करत, महिलांवर अत्याचार करणाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी करण्यात आली आहे. शिवजन्मोत्सव साजरा करताना उभारलेल्या पुतळ्याच्या संदर्भात वाद निर्माण करून महिलांवर हल्ला करणे हा निंदनीय प्रकार असल्याचेही निवेदनात म्हटले आहे.

सदर निवेदन नळदुर्ग पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सचिन यादव यांना देण्यात आले. या निवेदनावर नगरसेवक तानाजी जाधव, संजय दशरथ जाधव, गोपीनाथ माने, भगवंत सुरवसे, युवराज जगताप, वैभव पाटील, शिवाजी सुरवसे, स्वप्नील काळे, डॉ. जितेंद्र पाटील, आकाश काळे, सुनिल चौधरी, गणेश मोरडे, संतोष मुळे, संतोष किल्लेदार, अभय किल्लेदार, मोतीराम जाधव, महादेव जगताप, बालाजी किल्लेदार, शाम बागल, संदीप संतोष गायकवाड आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## जिल्हामध्ये अवकाळी पावसाचा तडाखा; द्राक्ष, हरभरा व ज्वारी पिकांवर संकट!

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ फेब्रुवारी -**

हवामान विभागाच्या अंदाजानुसार सोमवारी पहाटे जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस झाला. धाराशिव शहरासह तुळजापूर तालुक्यात मध्यम ते हलक्या स्वरूपाचा पाऊस पडला. अचानक झालेल्या या पावसामुळे काढणीला आलेल्या रब्बी पिकांवर परिणाम झाला असून विशेषतः द्राक्ष उत्पादक शेतकरी चिंतेत सापडले आहेत.

द्राक्ष बागांना फटका बसण्याची भीती जिल्ह्यात सुमारे ११०० एकर क्षेत्रावर द्राक्ष लागवड आहे. सध्या द्राक्ष हंगाम अंतिम टप्प्यात असून काढणी सुरू आहे. वादळी वाऱ्यामुळे परिसरातील काही द्राक्ष बागा झुकल्या आहेत.

## कदम घराण्याचे ८ वे कुलसंमेलन संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२४ फेब्रुवारी -**

राज्यातील ऐतिहासिक आणि पराक्रमी वारसा लाभलेल्या कदम घराण्याचे आठवे कुलसंमेलन रायगड जिल्ह्यातील पोलादपूर जवळील वडघर येथे उत्साहात पार पडले.

या संमेलनानिमित्त संपूर्ण महाराष्ट्रातून कदम बांधव एकत्र आले होते, ज्यामुळे वडघर गावच्या परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. कुलस्वामिनी आई तुळजाभवानीला स्मरण करून तुळजापूरातून आलेले गोंधळीमार्फत जागरण गोंधळाचा धार्मिक कार्यक्रम घेण्यात आलेला.

यावेळी पारंपरिक संभळाच्या वाद्यांच्या गजरात आणि 'जय भवानी, जय शिवाजी'च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. ग्रामदेवतेचे दर्शन घेऊन भव्य शोभायात्रा काढण्यात आली. ध्वजारोपण राज्याचे अध्यक्ष अमरराजे कदम यांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर कदमवक्षाचे पुजन पुण्याचे माऊलीशेठ कदम यांनी केले. कुलदेवताचा कुलधर्म याची माहिती तुळजापूरचे मुख्य भोपे पुजारी तथा राज्यप्रमुख अमरराजे कदम यांनी दिली.

सुत्रसंचालन व प्रस्तावना राज्याचे सचिव रामजी कदम यांनी केले. पोलादपूरमधील ग्रामस्थांनीही या सोहळ्याचे स्वागत अत्यंत आदरातिथ्याने केले.

## चैत्र पौर्णिमा यात्रेनिमित्त पालखी मार्गाची व्यापक स्वच्छता मोहीम

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२४ फेब्रुवारी -**

येथील बाजार चौकातून जाणाऱ्या श्री येडेश्वरी देवीच्या चैत्र पौर्णिमा यात्रेच्या पालखी मार्गाची व्यापक स्वच्छता मोहीम येरमाळा ग्राम पंचायतीच्या वतीने राबविण्यात आली. प्रशासकीय सरपंच प्रिया विशाल बारकुल यांच्या नेतृत्वाखाली संत गाडगेबाबा जयंतीचे औचित्य साधून ही साफसफाई करण्यात आली.

दरवर्षी चैत्र पौर्णिमेला बाजार चौकातून श्री येडेश्वरी देवीची पालखी मार्गक्रमण करते. या पवित्र मार्गावर स्वच्छता राखणे आवश्यक असताना काही नागरिकांकडून सातत्याने घनकचरा व सुका कचरा टाकला जात असल्याने परिसरात अस्वच्छता निर्माण झाली होती. विशेष म्हणजे, जिल्हा परिषद धाराशिव अंतर्गत ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने याच ठिकाणी घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनासाठी जाळीची कचराकुंडी उभारलेली असतानाही नियमांचे उल्लंघन करून रस्त्यावरच कचरा टाकला जात असल्याचे दिसून येत होते. दरवर्षी क्षेत्र पौर्णिमेला या मार्गाची साफसफाई केली जात असते.

या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायतीने जेसीबी व ट्रॅक्टरच्या सहाय्याने साचलेला कचरा हटवून परिसर स्वच्छ केला. सिमेंट कॉंक्रीटने बांधलेल्या पालखी मार्गावरील घनकचरा दूर करून मार्ग मोकळा करण्यात आला. स्वच्छतेनंतर बाजार चौक व पालखी मार्ग पुन्हा एकदा स्वच्छ व सुशोभित



दिसू लागला आहे.

यावेळी प्रशासकीय सरपंच प्रिया बारकुल यांनी स्पष्ट इशारा दिला की, या ठिकाणी कचरा टाकण्यास मनाई असून, 'कचरा टाकल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल' असा फलक लवकरच लावण्यात येणार आहे. त्यानंतरही नियम मोडणाऱ्यांवर दंडात्मक व कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्वच्छ भारत अभियानच्या धर्तीवर गाव स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे व कचरा केवळ कचराकुंडीतच टाकावा, असे आवाहन ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात आले आहे.

चैत्र पौर्णिमा यात्रेसाठी येणाऱ्या हजारो भाविकांच्या दृष्टीने ही स्वच्छता मोहीम अत्यंत महत्त्वाची ठरत असून ग्रामस्थांकडून या उपक्रमाचे स्वागत होत आहे.

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# माहूर तालुक्यात वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाचा तडाखा

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. २४ फेब्रूवारी-**

माहूर तालुक्यात २२ व २३ फेब्रुवारी २०२६ रोजी जोरदार वादळी वाऱ्यासह विजांच्या प्रचंड कडकडाटात झालेल्या अवकाळी पावसामुळे काढणीला आलेल्या गहू, हरभरा व ज्वारी पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. आंब्याचा मोहोर गळून पडल्याने फळबागांचे तसेच भाजीपाल्याचेही मोठे नुकसान झाले असून, अनेक ठिकाणी झाडे पडून शेतीचे नुकसान झाले आहे.प्रशासनाने तातडीने पंचनामे करण्याचे आदेश दिले असून,

तहसीलदार अभिजित जगताप तथा तालुका कृषी अधिकारी चंद्रकांत निमोड यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल व कृषी प्रशासनाद्वारे लांजीसह नुकसानग्रस्त भागातील पाहणी सुरू आहे.

आज २४ रोजी ग्राम महसूल अधिकारी चंद्रकांत बाबर व सहाय्यक कृषी अधिकारी सुधीर राजुरकर यांनी लांजी सज्जा शेतशिवारातील प्रतापसिंह हजारी यांच्या शेतासह नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी केली.

प्रादेशिक हवामान विभागाने २२ ते २८ फेब्रुवारी दरम्यान विदर्भ मराठवाड्यासह राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये अवकाळी पावसाची शक्यता वर्तवली होती. त्यानुसार रविवारी २२ रोजी दिवसभर ढगाळ वातावरण होते. त्यानंतर रात्रीपासूनच माहूर तालुक्यात अवकाळी पावसाने तुरळक प्रमाणात हजेरी लावली. तर सोमवारी २३ रोजी प्रचंड वादळी वाऱ्यासह आलेल्या अवकाळी पावसाने सर्वदूर हजेरी लावली. यामध्ये काढणीला आलेले हरभरा, गहू आणि ज्वारीची पिके




संकटात सापडला आहे, पीक विम्याची मागणी जोर धरु लागली असून प्रशासनाने पिक नुकसानीचे पाहणी पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळवून देण्याची मागणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी केली आहे.

२४ फेब्रुवारी २०२६ पर्यंतच्या माहितीनुसार,माहूर तालुक्यातील माहूर, वाई बाजार, सिंदखेड,वानोळा या चारही महसूल मंडळातील भागात या अवकाळी पावसाचा जोरदार फटका बसला असून, प्रशासनाद्वारे नुकसानग्रस्त भागातील पाहणी सुरू आहे.

निसर्गाच्या लहरीपणाचा फटका बसत सततची नापिकी होत असल्याने आर्थिक बजेट कोलमडलेला तालुक्यातील बळीराजा पुन्हा एकदा मोठ्या आर्थिक संकटात सापडला असून, शासनाकडून तातडीने तात्पुरती नुकसानभरपाई व उज्वल भविष्यासाठी शेतकरी कर्जमाफीची मागणी यानिमित्ताने जोर धरू लागली आहे.

**आदमपूर परिसरात रब्बी पिकांना वादळी वाऱ्याचा फटका**

**आदमपूर**-बलोली तालुक्यातील आदमपूर परिसरातील अटकळी,टाकळी,थडीसावळी, गळेगांव, मुतन्याळ, खतगांवसह अनेक भागातील शेत शिवारात रब्बी हंगामातील पिकांना सोमवार दि.२३ रोजी सायंकाळी

पाच वाजता वादळी वाऱ्याचा फटका बसला. काढणीला आलेल्या हरभरा पिकाचे खळे उरकताना शेतकरी व शेतमजूर यांची चांगलीच तारांबळ सुरूच उडाली. वाऱ्यावरती डोलणाऱ्या टंच उभे ज्वारी व गहू

पीक आडवे पडले. विजांच्या कडकडाटासह काही प्रमाणात टिपूस पाऊसही सुरू झाल्याने शेतकऱ्यांकडून चिंता व्यक्त करण्यात येत होती.आभाळ भरून येण्यापूर्वी लगोलग हरभरा गंजीस झाकपाक करण्याची कसरत शेतकऱ्यांना करावी लागली. हवामानाचा अंदाज खरा ठरल्याने वादळी वाऱ्यासह पावसाचेही संकेत मिळत होते.

वादळी वाऱ्याने परिसरात रात्रभर वीजपुरवठा खंडीत झाला होता.आंबा मोहोर गळाल्याने बागायतदारही नाखूष होते.अल्प शेतकऱ्यांकडून धना पेरणीही करण्यात आलेली होती.आडवे पडलेल्या पिकांची नासाडी उंदीर,घूस या प्राण्यांपासून होण्याची भितीही आहेच.एवढ्यात अवकाळी पावसाचे संकट टळले तर काहीतरी उत्पादन शेतकऱ्यांच्या गाठीशी पडेल.अन्यथा सोन्यावानी आलेले पीक मातीमोल होण्याची काळजी शेतकऱ्यांना लागून राहिलेली आहे.

# आरक्षणच्या नावाखाली खंडणीचा आरोप; शेतकऱ्यांची सामूहिक तक्रार

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २४ फेब्रूवारी-**

शहरातील प्रभाग क्र. २, आसरा नगर येथील नगरसेविका आफिया नाज अब्दुल रशिद यांच्या पती खाझी नाफे यांच्याविरुद्ध सांगवी बु. येथील शेतकऱ्यांनी एकत्र येत गंभीर स्वरूपाची तक्रार दाखल केली आहे. जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक, महानगरपालिका आयुक्त तसेच विमानतळ पोलिस ठाण्याकडे लेखी निवेदन देत संबंधितांवर फौजदारी कारवाईची मागणी करण्यात आली आहे. कारवाई न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशाराही शेतकऱ्यांनी दिला आहे.

तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, सांगवी शिवारातील गट क्रमांक ३३५, ३३८, ३३६, ३१९, ३२२, ३२३, ३२४, ३२५, २५५, २५८ या जमिनींवर फल्ट झोन, कब्रस्तान किंवा स्मशानभूमीचे आरक्षण असल्याचे सांगून शेतकऱ्यांवर दबाव आणला जात आहे. मात्र नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिनांक ०६/०३/२०२५ रोजी जारी केलेल्या पत्रानुसार सदर गटांवर कोणतेही आरक्षण नसल्याचे स्पष्ट करण्यात आल्याचा दावा तक्रारदारांनी केला आहे.

शेतकऱ्यांनी माध्यमांसमोर आरोप केला की, येथे आरक्षण आहे, तिथे आरक्षण आहे असे



सांगून वारंवार त्रास दिला जात आहे. जमीन आरक्षित असल्याचे कारण पुढे करून पैशांची मागणी (खंडणी) केली जात असल्याचा आरोपही करण्यात आला. जो शेतकरी पैसे देतो, त्याचा सर्व्हे नंबर तक्रारीत टाकला जात नाही; मात्र जो पैसे देत नाही, त्याचा सर्व्हे नंबर समाविष्ट करून कारवाईची धमकी दिली जाते, असा गंभीर आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

तसेच नगरसेविकेच्या लेटरहेडचा गैरवापर करून बनावट स्वाक्षरीसह दिनांक १०/०२/२०२६ रोजी तक्रार देण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. मात्र त्या लेटरहेडवर १०/०२/२०२५ अशी तारीख असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले आहे. निवडणुकीपूर्वीच लेटरहेड छापण्यात आल्याचा संशय तक्रारदारांनी व्यक्त केला आहे.

याशिवाय संबंधितांनी स्वतः ला प्रतिनिधी किंवा नगरसेवक म्हणून दाखवून महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांना मोबाईलद्वारे आदेश देणे, काम न केल्यास कारवाई करण्याची धमकी देणे असे प्रकार केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित मोबाईल क्रमांकांचे कॉल डिटेल रेकॉर्ड (उउळ) तपासण्यात यावेत, आरक्षणाबाबतची वस्तुस्थिती जाहीर करावी व दोषींवर तात्काळ गुन्हा दाखल करावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. अन्यथा व्यापक आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही प्रल्हाद शंकरराव कोकाटे, गणेश शंकरराव कोकाटे, माधव सटवाजी कोकाटे, गोपीनाथ बालाजी कोकाटे, चंद्रकांत बालाजी कोकाटे, पद्माकर गंगाराम, मधुकर गंगाराम, सचिन कोकाटे, बाबाराव पुंडलीकराव कोकाटे यांनी दिली आहे.

## नऊ वर्षीय शेख अबूहुरेरा पाशा याचा पहिला रोजा पूर्ण

**आदमपूर**-मुस्लिम समाजाचा दि.१९ फेब्रुवारीपासून पवित्र रमजान महिना सुरू झाला असून या महिन्यात मुस्लिम बांधव रोजा (उपवास) ठेवून अल्लाहची उपासना करतात. आत्मशुद्धी, संयम आणि त्याग यांचा



संदेश देणाऱ्या या पवित्र महिन्याला विशेष धार्मिक महत्त्व आहे. देगलूर येथील ९ वर्षीय शेख अबूहुरेरा पाशा या चिमुकल्याने आपल्या आयुष्यातील पहिला रोजा यशस्वीरित्या पूर्ण करून सर्वांचे लक्ष वेधले आहे. तब्बल १३ तास अन्न व पाणी न घेता तिने श्रद्धा,संयम आणि आत्मविश्वासाचे उत्तम उदाहरण घालून दिले.इतक्या लहान वयात पहिलाच रोजा पूर्ण केल्यामुळे तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.रोजा पूर्ण केल्यानंतर कुटुंबीयांनी तिचे अभिनंदन करत प्रोत्साहन दिले.नातेवाईकांनीही अबूहुरेराचे अभिनंदन करून तिच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.अबूहुरेराच्या पहिल्या रोजामुळे कुटुंबात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून तिच्या या कृत्याची सर्वत्र प्रशंसा होत आहे. लहान वयात धार्मिक कर्तव्याची जाणीव ठेवून त्याने दाखवलेला संयम इतर मुलांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे. रमजान महिन्यात रोजा ठेवण्यामागील उद्देश केवळ उपवास नसून आत्मसंयम, दानधर्म आणि प्रार्थना यांद्वारे आध्यात्मिक उन्नती साधणे हा आहे. शेख अबूहुरेराने पूर्ण केलेला हा पहिला रोजा तिच्या आयुष्यातील एक संस्मरणीय क्षण ठरला आहे.

## पारडी येथे नगराध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते शिवाजी महाराज यांचा दुग्धाभिषेक

**लोहा**-पारडी येथे शिवजयंती निमित्त विविध उपक्रम राबवून जयंती सोहळा मोठ्या थाटात माठात संपन्न झाला. नगरपरिषदेचे नगराध्यक्ष



शरद पवार, युवा नेते डॉ नवनाथ चव्हाण यांसह विविध मान्यवरांनी उपस्थिती होती या प्रसंगी सरपंच सुमनबाई डिकळे, गोविंद डिकळे,माजी सैनिक उद्धव डिकळे नगराध्यक्ष शरद पाटील पवार,.गोविंद डिकळे, संभाजी पवार, व्यंकटराव मोरवले, पत्रकार शिवराज पवार, ग्रामविकास अधिकारी अरूण चौधरी, सुर्यकांत गायकवाड,शालेय व्यवस्थापन समिती विठ्ठल डिकळे, बंडु पवार,पोलिस पाटील विनायक मटके, मोहन महाराज भारती आदींची उपस्थिती होती

## नागठाणा येथे मंठ संस्थानचा उत्तराधिकारी पट्टाभिषेक सोहळा

**उमरी**-उमरी तालुक्यातील श्रीक्षेत्र नागठाणा येथील श्री शिवयोगी निर्वाणी मठ संस्थानाचे उत्तराधिकारी म्हणून वेदमूर्ती बस्वराज स्वामी महाराज यांचा पट्टाभिषेक सोहळा आयोजित करण्यात आला आहे. त्यानिमित्ताने दिनांक २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२६ या दोन दिवसी



विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या धार्मिक कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कथाकार, कीर्तनकार, प्रवचनकार, साधू, संत, महंत, शिवाचार्य, बालयोगी, तपस्वी, आचार्य, वेदांताचार्य, सद्गुरु यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहे. या कार्यक्रमास पंचक्रोशीतील जवळपास दहा हजार भाविक भक्तांची उपस्थिती राहील त्या दृष्टिकोनातून पट्टाभिषेक सोहळ्याची जय्यत तयारी सुरू झाली आहे. दिनांक २८ फेब्रुवारी रोज शनिवारी सकाळी सात वाजता श्रीच्या संजीवन समाधीस रुद्राभिषेक, आठ वाजता धर्म ध्वजारोहण व पंचाचार्य पूजन, साडेनऊ वाजता ग्रंथराज परमरहस्य पारायण, दुपारी अडीच वाजता पारायणाची सांगता व महाप्रसाद, सायंकाळी पाच वाजता हरीद्रालेपण, रात्री आठ वाजता प्रवचन कीर्तन आणि शिवजागरण. दिनांक एक मार्च रोज रविवारी पहाटे पाच वाजता शिवपाठ, सहा वाजता श्रीच्या संजीवन समाधीस रुद्राभिषेक, सात वाजता वेदमूर्ती बस्वराज स्वामी यांचा पट्टाभिषेक सोहळा, सकाळी नऊ वाजता धर्मसभा आणि संगीत कार्यक्रम होईल त्यानंतर सकाळी ११ वाजता भव्य शोभायात्रा आणि दुपारी दोन वाजता महाप्रसाद. या पट्टाभिषेक सोहळ्यासाठी श्री प.पू. ष.ब्र. १०८ वेदांताचार्य शिवाचार्य रत्न सद्गुरु सिद्धलिंग शिवाचार्य महाराज साखरखेरडेकर बाबा यांचे गुरुत्व लाभणार असून श्री प.पू. ष.ब्र. १०८ सद्गुरु काशिनाथ शिवाचार्य महाराज (कांचबसवेश्वर मठ संस्थान पाथरी) यांचे साक्षीत्व लाभणार आहे. हा भव्य दिव्य पट्टाभिषेक सोहळा यशस्वी करण्यासाठी पट्टाभिषेक सोहळा समिती, श्री शिवयोगी निर्वाण मठ संस्थान नागठाणा, समस्त गावकरी मंडळी, शिष्य मंडळीच्या वतीने परिश्रम घेतले जात आहे.

# हिमायतनगर येथील कृषी कार्यालय समोर शेतकऱ्यांचे आमरण उपोषण

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. २४ फेब्रूवारी-**

हिमायतनगर तालुक्यातील पोटा बु. येथील ४५ शेतकऱ्यांनी पशुधन खरेदी करूनही शासनाचे अनुदान न मिळाल्याने २३ फेब्रुवारी हिमायतनगर येथील तालुका कृषी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. या घटनेमुळे तालुक्यात खळबळ उडाली आहे.

सदर शेतकऱ्यांची निवड प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषी विकास योजना (कोरडवाहू क्षेत्र विकास योजना) अंतर्गत दुग्ध व्यवसायासाठी निवड करण्यात आली होती. त्यानुसार १८ ऑक्टोबर २०२५ रोजी कामठा फाटा येथील आठवडी बाजारात कृषी अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत लाभार्थ्यांनी जनावरे खरेदी केली. यावेळी जनावरांचा विमाही उतरवण्यात आला. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, प्रत्येकाकडून २,५०० रुपये 'मावेजा' म्हणून घेण्यात आले. तसेच बिल काढण्यासाठी अतिरिक्त रक्कम देण्याची मागणी करण्यात

आल्याचा आरोपही त्यांनी लेखी निवेदनात केला आहे. अन्यथा योजनेतील पैसे परत पाठवले जातील, असेही सांगण्यात आल्याचा दावा शेतकऱ्यांनी केला आहे.संबंधी अधिकारी कर्मचारी यांना तात्काळ निलंबित करावे.

या मागणीसाठी शेतकऱ्यांनी तालुका कृषी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. सामाजिक कार्यकर्ते संतोष पुल्लेवाड, आनंदराव जळपते यांच्यासह सर्व लाभार्थी शेतकरी उपोषणात सहभागी झाले आहेत.

## प्राध्यापकासह शैक्षणिक संस्थेच्या पदाधिकाऱ्यांवर कारवाई करा: ॲड. नरवाडे

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि. २४ फेब्रूवारी-**

विद्यार्थिनीची छेड करणाऱ्या प्राध्यापक व त्यांना पाठीशी घालणाऱ्या संस्थेचे अध्यक्ष, सचिव, प्राचार्ययांच्याविरुद्ध उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये महिला कर्मचारी आणि विद्यार्थ्यांच्या लैगीक छळाचे प्रतिबंध, निषेध आणि निवारण नियम २०१५ नुसार कारवाई करून संस्थेचे अनुदान आणि सलग्नता रद्द करावी अशी मागणी ॲड. प्रमोद नरवाडे यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाकडे केली आहे.



**विद्यार्थीनीची छेड प्रकरण**

नारायणराव चव्हाण विधी महाविद्यालयात प्रा. महेश पाटील यांनी एका विद्यार्थिनीची छेडछाड केली होती. त्या विद्यार्थिनीने पालकांना घेऊन महाविद्यालय गाठल्यानंतर पालकांनी न्यायाची मागणी केली. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून परिस्थिती नियंत्रणात आणली परंतु महाविद्यालय प्रशासनाने महाविद्यालयात घडलेला प्रकार पोलिसांना सांगितला नाही. प्रा. महेश पाटील यांना पाठीशी घालण्यात आले आहे. या घटनेमुळे शैक्षणिक वर्तुळात खळखळ उडाली असून प्रा. महेश पाटील यांच्यासह त्यांना पाठीशी घालणाऱ्या संस्थेचे अध्यक्ष, सचिव व प्राचार्य डॉ. विना पाटील यांच्यावर उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये महिला कर्मचारी आणि विद्यार्थ्यांच्या लैगीक छळाचे प्रतिबंध, निषेध आणि निवारण नियम २०१५ नुसार कठोर व दंडात्मक कारवाई करावी, पालकांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने प्रा. महेश पाटील यांच्यावर गुन्हा दाखल करून त्यांना बडतर्फ करावे असे ॲड. प्रमोद नरवाडे यांनी विद्यापीठ अनुदान आयोग दिल्ली व स्वारातीम विद्यापीठाचे कुलगुरू यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

# परोटी-रिठा डांबरीकरण रस्त्याच्या कामावर ग्रामस्थांचा आक्षेप

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २४ फेब्रूवारी-**

परोटी ते रिठा या अतिदुर्गम भागातील डांबरीकरण रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याचा आरोप करत स्थानिक ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला आहे. संबंधित विभागाने तातडीने लक्ष घालून दर्जेदार काम करावे, अशी मागणी दोन्ही गावांतील नागरिकांनी केली आहे.

किनवट सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत येणाऱ्या परोटी ते रिठा मार्गाचे डांबरीकरणाचे काम सुरू असून रस्त्याच्या मजबुतीकरणाच्या प्रक्रियेत तांत्रिक निकषांचे पालन होत नसल्याचा ग्रामस्थांचा आरोप आहे. रस्त्याची जाडी, साहित्याचा दर्जा व कामाची पद्धत समाधानकारक नसल्याने भविष्यात रस्ता लवकर खराब होण्याची शक्यता असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

गुरुवारी (दि. १९ फेब्रुवारी) परोटी व रिठा येथील ग्रामस्थांनी कामाच्या ठिकाणी जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी संबंधित ठेकेदारच्या कामा बाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांकडे



नाराजी व्यक्त केली. शासनाचा निधी खर्च होत असताना दर्जेदार काम होणे आवश्यक आहे. अन्यथा काही महिन्यांतच खड्डे पडून नागरिकांना त्रास सहन करावा लागेल, अशी प्रतिक्रिया ग्रामस्थांनी दिली.

या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता झरीकर यांना माहिती देण्यात आली असता, त्यांनी लवकरच स्थळ पाहणी करून कामाची गुणवत्ता तपासून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन ग्रामस्थांना दिले.

यावेळी परोटी येथील अशोक पवार, विनोद जाधव, बालाजी भालके यांच्यासह दोन्ही गावांतील अनेक नागरिक उपस्थित होते. संबंधित विभागाने कामावर काटेकोर देखरेख ठेवून टिकाऊ व दर्जेदार रस्ता निर्माण करावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

# बांगलादेश सीमावर्ती गावात खा. डॉ. अजित गोपछडे यांचा मुक्काम

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २४ फेब्रूवारी-**

भारताच्या बांगलादेश सीमावर्ती गावांमध्ये खा. डॉ अजित गोपछडे यांनी दुसऱ्यांदा मुक्काम केला आहे. या भागातील अनेक गावांना भेटी देऊन त्या भागातील सामाजिक जीवन समजून घेत तेथील विद्यार्थी , नागरिक आणि भारतीय सैन्यातील जवानांशी त्यांनी संवाद साधला . भारतीय सीमावर्ती भागाच्या सुरक्षेसाठी तैनात असलेल्या जवानांचे अभिनंदनही केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनप्रतिनिधींना सीमावर्ती गावांना भेट देऊन तेथील नागरिक तसेच सुरक्षा दलातील जवानांशी संवाद साधण्याच्या केलेल्या आव्हानाच्या प्रेरणेतून खा. डॉ. गोपछडे यांनी हा संवाद साधला आहे.

खा.डॉ. अजित गोपछडे यांनी पुर्वोत्तर भारतातील त्रिपुरा राज्यातील सीमांत भागाचा दौरा केला. या दौऱ्यात अगरतळा



परिसरातील भारत-बांगलादेश सीमेलगत असलेल्या लंकामुरा या गावासह सीमेवरच्या अनेक गावांना भेटी दिल्या. तेथील गावात मुक्काम करून स्थानिक जनजीवन जवळून अनुभवले. या भेटीत त्यांनी ग्रामीण भागातील जनते सोबत त्यांच्या घरी जेवणाचा आस्वाद घेतला. आपुलकीने संवाद साधत भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारत सरकारच्या विकासात्मक कामा बाबतही चर्चा केली. जनप्रतिनिधी म्हणून या दौऱ्यात केंद्र व राज्य शासनाच्या समन्वित प्रयत्नांतून सीमावर्ती दुर्गम भागांमध्ये होत असलेल्या विकासकामांचे प्रत्यक्ष निरीक्षण करण्यात आले. रस्ते, वीजपुरवठा, डिजिटल कनेक्टिव्हिटी, रोजगार, शैक्षणिक आणि आरोग्य सुविधा, सीमा सुरक्षेसाठी काटेरी मजबूत कुंपण व सामाजिक सेवांचा विस्तार यामुळे सीमांत प्रदेशांमध्ये सकारात्मक बदल घडताना दिसत असून हा अनुभव समाधानकारक व अभिमानास्पद ठरल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

गतवर्षी खा. डॉ. अजित गोपछडे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील सीमावर्ती गावातील भेटीच्या कार्यक्रमात मेघालय राज्यातील डावकी परिसरात भेट दिली होती. त्याच भावनिक सातत्यातून यावर्षी त्रिपुरा राज्यातील सीमेलगत प्रदेशांचा आढावा घेण्यात आला. या भेटीत सीमावर्ती जीवनातील वास्तव , आव्हाने आणि तेथील नागरिकांची राष्ट्रनिष्ठा प्रत्यक्ष अनुभवली . या दौऱ्यादरम्यान सीमा सुरक्षा बलाचे अधिकारी आणि जवानांशी त्यांनी मनमोकळा संवाद साधला. कठीण हवामान , आव्हानात्मक भौगोलिक परिस्थिती आणि कुटुंबापासून दूर राहून देश रक्षणासाठी अखंडपणे सेवा समर्पण जपणाऱ्या सैनिकांबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी सैनिकांना फळे , मिठाई वाटून त्यांची भावनिक पाठराखण केली. याशिवाय वाघा, अटारी बॉर्डर येथील बेटिंग द रिट्रीट सोहळ्याच्या धर्तीवर अगरतळा बांगलादेश सिमेजवळ आयोजित विशेष समारंभाचे अवलोकन करण्यात आले. याठिकाणी भारतीय सीमेवरील गांव लंकामुरा आणि बांगलादेशातील सरहद्दीवरील गांव अखुरा या दोन्ही सीमेवरील गावांच्या हद्दीत या कार्यक्रमाचे आयोजन होते.

या कार्यक्रमात स्थानिक नागरिक, पर्यटक, सुरक्षा दलातील जवान तसेच सीमेपलीकडील नागरिक व सुरक्षा रक्षक यांचा सहभाग आढळून आला.

या प्रेरणादायी सेवा भेटीमुळे सीमा सुरक्षा करणारा प्रत्येक जवान आणि त्या भागात वास्तव्यात असलेला प्रत्येक नागरिक हा राष्ट्राच्या सामर्थ्याचा भक्कम स्तंभ असल्याची जाणीव अधिक दृढ झाली. त्यांच्या पाठीशी सरकार ठामपणे उभे आहे असा विश्वासही खा. डॉ अजित गोपछडे यांनी व्यक्त केला.

# रोहयो अंतर्गत विहीरीचे काम कागदोपत्री दाखवून परस्पर पैसे उचलले

## सेनगाव तालुक्यात रोहयो अंतर्गत विहीरींचा मोठा घोटाळा उघडकीस





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ फेब्रुवारी**

जिल्ह्यातील सेनगाव तालुक्यात अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी मंजूर झालेल्या रोहियो अंतर्गत विहिरींचा मोठा घोटाळा उघडकीस आला आहे. विहिरीचे काम प्रत्यक्षात न करता कागदोपत्री पूर्ण दाखवून लाखो रुपयांचे अनुदान परस्पर उचलल्याचा प्रकार समोर आला आहे.

सेनगाव तालुक्यातील पळशी शिवारातील शेतकरी रामचंद्र खडसे यांनी केलेल्या तक्रारीनंतर हा प्रकार उघड झाला. २०२१-२२ मध्ये रोहियो अंतर्गत त्यांच्या गट क्रमांक ५९ मधील शेतासाठी विहीर मंजूर झाली होती. मात्र प्रत्यक्षात काम न होता सुमारे १ लाख ७५ हजार २२४ रुपयांची रक्कम मजुरांच्या नावावर उचलण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाले. जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या आदेशानुसार नायब तहसीलदार नकुल वाघुंडे यांच्या पथकाने २० फेब्रुवारी रोजी पाहणी केली असता तक्रारीत तथ्य आढळल्याचे खुद्द नायब तहसीलदार वाघुंडे यांनी सांगितले.

यानंतर इतर शेतकऱ्यांनीही आपल्या प्रकरणांची चौकशी केली असता धक्कादायक बाबी समोर आल्या. सयाबाई परसराम जगताप यांच्या नावावर २ लाख ३८ हजार, माजी सरपंच इंदुबाई विश्वनाथ खडसे यांच्या नावावर १ लाख ४६ हजार ०१६ रुपये, श्रीराम आनंदा जगताप यांच्या नावावर १ लाख ६६ हजार ३७४ रुपये, पांडुरंग खडसे यांच्या नावावर १ लाख १७ हजार रुपये, राधाबाई लिंबाजी होळपादे यांच्या नावावर २ लाख ३६ हजार रुपये, तर पांडुरंग मारुती खडसे यांच्या नावावर १ लाख ७९ हजार ३१६ रुपये अनुदान परस्पर उचलल्याचे समोर आले आहे.सुमारे १० शेतकऱ्यांच्या मिळून १७ लाख १५ हजार १६७ रुपयांचा निधी, तसेच जुन्या विहिरी नव्याने दाखवून आणखी १५ लाख ४२ हजार ४६२ रुपये उचलल्याचा आरोप आहे. काही शेतकऱ्यांनी स्वखर्चाने विहिरी पूर्ण करूनही अनुदान न मिळाल्याची तक्रार केली आहे. आता या प्रकरणी माजी सरपंच इंदुबाई खडसे या इतर अल्पभूधारक शेतकऱ्यांसमवेत जाऊन जिल्हा प्रशासनाकडे तक्रार करणार असल्याचे त्यांनी सांगितले. २०२२ ते २०२५ दरम्यान मंजूर झालेल्या ८५ विहिरींपैकी अनेक विहिरींचे अस्तित्वच नसल्याने रोजगार हमी योजनेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणी सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. या प्रकरणी जिल्हा प्रशासन काय कार्यवाही करते याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# राज्य शासनाच्या कल्याणकारी योजनांच्या प्रचाररथाला हिरवी झेंडी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ फेब्रुवारी**

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५-२०२६ अंतर्गत विविध विभागाच्या कल्याणकारी विविध योजनांची जिल्ह्यातील लाभार्थ्यांना माहिती व जनजागृती होण्यासाठी जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीने आयोजित चित्ररथाला आज येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात जिल्हा नियोजन अधिकारी श्रीमती अनिता लव्हारे यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून प्रचार-प्रसिद्धी मोहिमेचा प्रारंभ करण्यात आला. हे चित्ररथ जिल्ह्यातील शहरी आणि ग्रामीण भागात जाऊन प्रचार-प्रसिध्दी करणार असल्याने नागरिकांना तसेच लाभार्थ्यांना या चित्ररथाच्या माध्यमातून विविध योजनांची माहिती मिळण्यास मदत होणार आहे.

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०, मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान, आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना, महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना, बालविवाह प्रतिबंधक प्रतिज्ञा, मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या योजना आदी योजनांचा समावेश आहे.

तसेच नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा-२, मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रसते योजना, रेशीम शेतीला प्रोत्साहन, महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जनआरोग्य योजना (एकत्रित), मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम या कल्याणकारी योजनांवर आधारित तयार करण्यात आलेल्या भित्तीपत्रिकाचे देखील मान्यवरांच्या हस्ते यावेळी विमोचन करण्यात आले.

हिंगोली जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेला शासनाच्या कल्याणकारी योजनांची माहिती व्हावी आणि त्यांना या योजनेचा लाभ घेता यावा, यासाठी चित्ररथ आणि भित्तीपत्रिकाच्या माध्यमातून व्यापक जनजागृती करण्यात येणार आहे. यावेळी सांख्यिकी उपसंचालक एस. एम. रचावाड, जिल्हा माहिती अधिकारी प्रभाकर बारहाते, उपसंपादक चंद्रकांत कारभारी, श्रीकांत देशमुख, मनोहर भारती आदींची उपस्थिती होती.

# पत्रकारांच्या शिष्टमंडळाने घेतली मुंबईत महसूल मंत्र्यांची भेट



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ फेब्रुवारी**

हिंगोली जिल्ह्यातील पत्रकार वेल्फेअर सोसायटी कोअर कमिटीच्या शिष्टमंडळांनी २४ फेब्रुवारी रोजी राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची मुंबई येथील निवासस्थानी भेट घेतली यावेळी पत्रकारांच्या घराच्या जागे संदर्भात तात्काळ प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याचे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांना दिले यावेळी हिंगोली विधानसभेचे आमदार तानाजी मुटकुळे, माजी आमदार रामराव वडकुते यांच्यासह पत्रकार वेल्फेअर सोसायटीच्या शिष्टमंडळाचा समावेश होता. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निवासस्थानी हिंगोली जिल्ह्यातील पत्रकारांचे शिष्टमंडळानी मंगळवारी भेट असता पत्रकार वेल्फेअर सोसायटीच्या माध्यमातून जागेच्या मागणीचे निवेदन देण्यात आले असून निवेदनातील प्रमुख मागणी निवासासाठी जागा उपलब्ध करून देण्यासंदर्भात असल्याने महसूल मंत्री बावनकुळे यांनी तो प्रस्ताव तात्काळ मंजूर करीत हिंगोली जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांना तातडीने पत्रकारांच्या जागे संदर्भातला प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याचे निर्देश दिले.यावेळी वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष कल्याण देशमुख, संचालक गजानन मगर, संतोष भिसे, प्रकाश इंगोले, संदीप नागरे, रवी शिखरे, विजय गुंडेकर, संदीप पाचमासे यांची उपस्थिती होती. पत्रकारांच्या घराच्या जागी संदर्भातला प्रस्ताव जिल्हाधिकारी मार्फत शासनाकडे सादर होताच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थिती मुंबई येथे पुढील कारवाईसाठी बैठक होणार असल्याने हिंगोली जिल्ह्यातील पत्रकारांच्या घरांचा प्रश्न लवकरच मार्गी लागण्याच्या आशा पल्लवीत झाले आहेत.



**हिंगोली- येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर विविध मागण्यांसाठी लिपीक वर्गीय शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांनी कामबंद आंदोलन सुरू केल्यामुळे जिल्हा परिषदेतील अनेक विभागात कर्मचारी नसल्यामुळे शुकशुकाट दिसत आहे. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### लिटल फ्लॉवर इंग्लीश स्कूलमध्ये स्नेहसंमेलन



हिंगोली- लिटील फ्लॉवर इंग्लिश स्कूल येथे स्नेहसंमेलन निमित्त आयोजित क्रीडा स्पर्धेचे उत्साहपूर्ण वातावरणात उद्घाटन संपन्न झाले. या प्रसंगी सौरभ चव्हाण व विजय घ्यार यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमास शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक वृंद, कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. उद्घाटन प्रसंगी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना क्रीडा स्पर्धेमुळे शारीरिक तंदुरुस्ती, शिस्त, संघभावना व आत्मविश्वास वृद्धिंगत होतो असे सांगितले. विद्यार्थ्यांनी मार्चपास्ट व विविध क्रीडा प्रकारांमध्ये उत्साहाने सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे नियोजन शाळेतील क्रीडा विभागाने केले होते. सर्व स्पर्धकांना शुभेच्छा देत स्पर्धा यशस्वी होण्यासाठी आयोजकांनी परिश्रम घेतले.

### जिल्हाकचेरीत संत गाडगेबाबा जयंती साजरी

हिंगोली-येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात संत गाडगेबाबा महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस उपजिल्हाधिकारी (सामान्य) अनिल माचेवाड यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी नायब तहसीलदार डी. एस. जोशी, संतोष बोथीकर यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी यांनीही यावेळी संत गाडगेबाबा महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन अभिवादन केले.

### नर्सी पोलिसांची अवैध वाळू वाहनांवर कारवाई



हिंगोली-पोलिस स्टेशन नरसी नामदेव हद्दीत अवैध वाळू वाहतूक करताना सेनगाव हिंगोली रोडवर गुरुद्वारा जवळ नरसी नामदेव येथे एक ट्रॅक्टर मिळून आल्याने एक ट्रॅक्टर व रेती असा एकूण ५८५००० मुद्देमाल जप्त करून आरोपी नामे केशव किसन वाबळे वय ३० वर्ष रा बोराळा ता हिंगोली याचेविरुद्ध पोलिस स्टेशन नरसी नामदेव येथे गु र न ३५/२०२६ कलम ३०३(२), भा न्या स सहकलम ४८(७),(८) प्रमाणे गुन्हा दाखल केला असून सदरची कामगिरी पोलिस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मिना, यांचे मार्गदर्शनाखाली स पो नि घारगे, दिघाडे, पोले यांनी केली आहे.

# लिपीक वर्गीय कर्मचाऱ्यांच्या कामबंद आंदोलनामुळे कामकाज ठप्प



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ फेब्रुवारी**

जिल्ह्यातील शासकीय व निमशासकीय कार्यालयातील लिपीक वर्गीय कर्मचाऱ्यांच्या चौथ्या वेतन आयोगापासूनच्या वेतन त्रुटी दूर कराव्यात या मागणीसह इतर मागण्यांसाठी लिपीक वर्गीय कर्मचारी संघटनेच्यावतीने दुसऱ्या दिवशीही कामबंद आंदोलन सुरू असल्यामुळे जिल्हा परिषदेसह पाच पंचायत समितीमधील कामकाज ठप्प पडले आहे.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शासकीय व निमशासकीय लिपीक वर्ग अधिकारी व कर्मचारी यांनी कामबंद आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनाचा आजचा दुसरा दिवस असून या आंदोलनात मोठ्या संख्येने लिपीक वर्गीय कर्मचारी सहभागी झाले असून इतर कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी आंदोलनाला पाठींबा दिला आहे. चौथ्या वेतन आयोगापासूनच्या वेतन त्रुटी दूर करणे, सुधारीत वेतनश्रेणी लागू करावी, पदनामामध्ये बदल करावा, जुनी सेवानिवृत्ती वेतन योजना पूर्वीप्रमाणे लागू करावी आदी मागण्यांचा समावेश आहे. या आंदोलनामुळे जिल्हा परिषदेसह हिंगोली, कळमनुरी, सेनगाव, औंढा नागनाथ, वसमत पंचायत समितीचे कामकाज दुसऱ्या दिवशीही ठप्प पडले होते. सध्या अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असून या अधिवेशनासाठी मागविण्यात आलेली माहीती दिली जाणार नाही अशी भूमिका कर्मचाऱ्यांनी घेतली आहे. त्यामुळे जिल्हा परिषद प्रशासन चांगलेच अडचणीत आले आहे. या आंदोलनात राजीव घुगे, संतोष बांगर, नितीन दहीफळे, आदी सहभागी झाले आहेत.

# बनावट कागपत्राच्या आधारे प्लॉटची रजिस्ट्री करून फसवणूक

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ फेब्रुवारी**

फरशी काम करणाऱ्या एका व्यक्तीने प्लॉट खरेदी करण्यासाठी मेहनतीने पैसे जमा केले. परंतु एकाने त्याच्याकडून साडे चार लाख रूपये घेवून बनावट कागदपत्रे तयार करून रजिस्ट्री करून दिली. खरेदीदाराने प्लॉटची मोजणी करून देण्याचा तगादा लावल्यानंतर मला प्लॉटबद्दल काही माहीती नाही असे म्हणून फसवणूक केली. याप्रकरणी शामलाल यादव यांनी पोलिस अधीक्षकांकडे संबंधित व्यक्तीविरूध्द तक्रार केली आहे.

कळमनुरी तालुक्यातील एका शेतकऱ्याची चार एकर जमीन बनावट आधार कार्ड व बोगस कागदपत्रे तयार करून परस्पर विक्री केल्याचा प्रकार मागील आठवड्यात उघडकीस आला आहे. या प्रकरणी शहर पोलिस ठाण्यात सह दुय्यम निबंधक यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणातील आरोपींना अटक करण्यासाठी पोलिसांची पथके रवाना करण्यात आली आहेत.

दरम्यान या प्रकारानंतर पुन्हा एकदा बनावट कागदपत्रे तयार करून फरशी काम करणारे शामलाल मोहनलाल यादव रा रिसाला बाजार यांचीही फसवणूक झाल्याचे उघडकीस आले आहे. शामलाल यांनी रोजमजूरी करून प्लॉटसाठी साडेचार लाख जमा केले होते. त्यांनी रामप्रसाद विठ्ठल वाघ धंदा किर्तनकार रा बळसोंड यांच्या मार्फत अंधारवाडी शिवारात सर्व्हे क्रमांक २३/३ मधील मालमत्ता क्र ५९६ ज्याचा प्लॉट क्र १०९ पूर्वेकडील भाग ज्याची लांबी ३० फुट व पू प २० फुट एकूण क्षेत्रफळ ६०० चौ फुट आहे. रामप्रसाद वाघ यांनी प्लॉट धारकाचे मालकी प्रमाणपत्र सुध्दा शामलाल यांना दाखविले. त्यानंतर साडेचार लाख रूपये घेवून तीन साक्षीदार रूख्मीचंद लक्ष्मण भगत, राजेश ललीत यादव, जगन किशनलाल भगत यांच्यासमोर दस्त क्र ४०५६/२०१६ दि ८ ऑगस्ट २०१६ रोजी खरेदी खताची रजिस्ट्री करून दिली. खरेदीखत झाल्यावर शामलाल यांनी अनेकवेळा रामप्रसाद वाघ यांना प्लॉट मोजून देण्याची विनंती केली परंतु मी तुम्हाला खरेदी खत करून दिले आहे. आता मला प्लॉटबद्दल काहीच माहीत नाही असे उडवाउडवीची उत्तरे दिली. शामलाल यांची फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी ग्रामीण पोलिस ठाण्यात रामप्रसाद विठ्ठल वाघ यांच्याविरूध्द तक्रार दाखल केली आहे. याप्रकरणी सखोल चौकशी करण्याची मागणी तक्रारीत करण्यात आली आहे.

# बाळशास्त्री जांभेकर यांचा अवमान करणाऱ्या अधिकाऱ्याविरूध्द कारवाई करा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ फेब्रुवारी**

जिल्हाधिकारी कार्यालयात २० फेब्रुवारीला दर्पणकार, मराठी पत्रकारीतेचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात दुर्दैवी व निषेधार्थ प्रकार घडला.

या कार्यक्रमास उपस्थित असलेले जिल्हा पुरवठा अधिकारी आप्पासाहेब पाटील यांनी महापुरूषांना अभिवादन करताना पायातील पादत्राणे न काढता अभिवादन केले हा प्रकार केवळ असंवेदनशील नसुन शासकीय शिष्टाचार, सांस्कृतिक मुल्य व महापुरूषांच्या सन्मानाच्या परंपरेचा स्पष्ट भंग करणारा आहे. यामध्ये गंभीर बाब म्हणजे जयंती कार्यक्रमाचे छायाचित्र संबंधित शासकीय कार्यालयामार्फतच प्रसारीत करण्यात आले असुन त्या छायाचित्रात शिष्टाचार भंग स्पष्टपणे दिसून येत आहे. त्यामुळे संपूर्ण पत्रकारात संताप व नाराजीची भावना निर्माण झाली आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्याविरूध्द शासकीय शिष्टाचार भंगाबाबत तात्काळ चौकशी करून योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करावी, संबंधित अधिकार्यांकडून पत्रकार समाजाची व नागरीकांची जाहीर माफी घेण्यात यावी, भविष्यात अशा प्रकारची पुनरावृत्ती टाळण्यासाठी सर्व शासकीय अधिकारी व कर्मचार्यांना महापुरूषांच्या कार्यक्रमातील आचार संहीता बंधनकारक करण्यात यावी, अशा अनेक मागण्या निवेदनात केल्या आहेत. निवेदनावर नंदकिशोर तोष्णीवाल, बसंतकुमार भट्ट, प्रद्युम्न गिरीकर, शिवाजी मेटकर, सौरभ साकळे, विजय दगडू, चंद्रकांत वैद्य, सुधीर गोगटे, अलिमोद्दिन कादरी, दिलीप खोडके आदीच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# काँग्रेस प्रवक्ते हनुमंत पवार यांच्या मारहाणीचा निषेध, कारवाईची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ फेब्रुवारी**

काँग्रेसचे प्रवक्ते हनुमंत पवार यांना भाजपच्या कार्यकर्त्यांकडून झालेल्या मारहाणीचा हिंगोली जिल्हा काँग्रेस समितीच्यावतीने जाहीर निषेध करण्यात आला असून या आरोपींवर कडक कारवाई करण्याची मागणी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांना दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे.

काँग्रेस प्रवक्ते हनुमत पवार यांना पुणे येथे भाजपच्या कार्यकर्त्यांकडून मारहाण करण्यात आली. या घटनेचे पडसाद हिंगोलीतही उमटले असून जिल्हा काँग्रेस कमिटीकडून या घटनेचा निषेध करीत लोकशाहीला काळीमा फासणारी ही घटना असल्याचा आरोप करीत या घटनेची सखोल चौकशी करून संबंधित दोषींवर तत्काळ गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष सुरेशअप्पा सराफ, साईनाथ जाधव, बंटी नागरे, शामराव जगताप, गजानन देशमुख यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.